... तर भविष्यात नगर शहरात 'टोळीयुद्धा'चा भडका उडेल?

स्नेह भोज
स्वाद मिळे ही मिळे तसा!
बारसे, डोहाळे जेवण, साखरपुडा, गेट टू गेदर
अश्या छोटेखानी समारंभांसाठी
परफेक्ट हॉल आणि सोबत
स्नेहभोजची रुचकर थाळी सुद्धा...
बजेटमध्ये
सुटसुटीत कार्यक्रम
रुचिरा टॉवर्स, झोपडी कॅन्टीन, आडवी डोंगरी, अहमदनगर
86 98 8080 88

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. १९४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रुपये | अहमदनगर, मंगळवार दि. १०.०९.२०२४ | अंक नं. १६३ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020

होय..आम्ही घेतोय
आपल्या डोळ्यांची काळजी..
ऑप्टोमेट्रिस्टकडून डोळ्यांची दररोज मोफत तपासणी
एकदा अवश्य भेट द्या व खात्री करा
▪ नंबरचा चष्मा फक्त रु. 299 रुपयात
▪ प्रोग्रेसिव्ह चष्मा फक्त रु. 900 रुपयात
▪ ब्लूकट चष्मा फक्त रु. 500 रुपयात
अहमदनगरचे सुप्रसिध्द
अंजली चष्मावाला
पत्ता : शिवशक्ती कॉम्प्लेक्स, पटेल मेडिकलजवळ, चितळेरोड, अहमदनगर, मो : 8796824353

पोलिस आणि कायदा बनला गुन्हेगारांच्या हातचे 'बाहुले'

नगर – जिल्ह्यासह नगर शहरातील कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्याची जबाबदारी ज्या पोलिस खात्यावर आहे, त्याच पोलिस खात्याच्या प्रमुखांनी सध्या 'कायदा' गुन्हेगारांच्या हाती सोपल्याचे वारंवार स्पष्ट होत आहे. त्यामुळेच शहरात खून, खुनाचे प्रयत्न, हाणामारी अशा घटनांमध्ये वाढ झाली असून, या घटनांमध्ये खुलेआम तलवार, कोयते, लाठ्या, काठ्या आणि गावठी कट्टयांचा वापर केला जात आहे. या वाढत्या घटना पाहता शहरात गुन्हेगारांना कोणतेही 'भय' राहिलेले नसून सर्वसामान्य जनता मात्र 'भयभीत' झाली आहे. असेच प्रकार घडत राहिले तर आज 'टोळीयुद्धा'च्या उंबरठ्यावर उभे असलेल्या नगर शहरात लवकरच 'टोळीयुद्ध' भडकल्यास आश्चर्य वाटायला नको!

शहरासह जिल्ह्यात घडणाऱ्या अनुचित घटनांमुळे पोलिस खात्याच्या अब्रूची लक्तरे आधीच वेशीवर लटकली आहे. गुन्हेगारांना आणि त्यातली त्यात 'व्हाईट कॉलर' गुन्हेगारांना तर पोलिसांकडूनच अभय मिळत आहे. त्यामुळे ताबेमारी, दमबाजी, हाणामारी, खुनाचा प्रयत्न आणि खून अशा घटना दररोज घडत आहेत. सुपाऱ्या घेऊन हत्या केल्या जात आहेत. सामान्य माणसावर, कुटुंबावर हल्ले चढवले जात आहेत, दिवसाढवळ्या लूटमार केली जात आहे. तलवार, कोयते, दांडके, कुऱ्हाडी या शस्त्रास्त्रांचा खुलेआम वापर सुरू असून, व्यापारी, व्यवसायिकांवर सपासप वार करून त्यांना जखमी करून लूट केली जात आहे. अशा भयानक घटना घडत असताना आपण नगर शहरात राहतो की, बिहारमधील एखाद्या शहरात, हा प्रश्न नागरिकांना पडला आहे. मुलींच्या अपहरणाच्या घटना सातत्याने सुरू आहेत. माणुसकीला लाजवेल असे प्रकार अनेकदा समोर आले आहेत. अशावेळी पोलिस खात्याचा कारभार 'रामभरोसे'च सुरू आहे का?

पोलिस अधीक्षक राकेश ओला हे कायदा सुव्यवस्था आणि शांतलेच्या दृष्टीने नेमके काय करत आहेत? असा सवाल विचारला जात आहे. केवळ निवेदने घेणे आणि ते फाईलला लावणे एवढेच तुमचे काम आहे का? एखादी तक्रार, निवेदन आल्यानंतर त्वावर तात्काळ कायदेशीर कारवाई केली असती तर केडगाव उपनगरातील घटना घडलीच नसती. ही एकच नव्हे तर अनेक घटना आहेत, ज्या पोलिसांच्या दुर्लक्षामुळे घडल्या आहेत आणि घडत आहेत.

गुन्हेगारांना जरब बसवण्यासाठी आता पोलिसांनीच 'दादा' बनले पाहिजे

शहरातील कायदा सुव्यवस्था पूर्णत: विस्कळीत झाली आहे. पोलिस म्हणजे गुन्हेगारांच्या हातचे 'बाहुले' बनले असून, सध्या सुपाऱ्या घेऊन 'कार्यक्रम' राबविणाऱ्या अनेक टोळ्या सक्रीय झाल्या आहेत. या टोळ्या आणि त्यातील गुन्हेगारांचा बिमोड करण्यासाठी पोलिस खात्यानेच आता 'दादा' बनले पाहिजे, नाहीतर आगामी काळात शहरात टोळीयुद्धाचा भडका उडेल आणि त्यात सर्वसामान्यांचा जीव जाईल. ही भविष्यातील भीतीदायक चित्र डोळ्यासमोर आल्यास आजतरी नगरमध्ये कृष्णप्रकाश, विश्वास नांगरे पाटील अशा अधिकाऱ्यांची गरज आहे असेच वाटते.

भाजप पदाधिकाऱ्यावर सशस्त्र हल्ला

माजी नगरसेवक विजय पठारेसह १७ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

नगर – शहरातील केडगाव उपनगरात लिंक रोड वर रंगोली हॉटेलच्या पाठीमागील परिसरात जागेचा वादातून भाजप पदाधिकाऱ्यावर शिवसेनेचा माजी नगरसेवक विजय पठारेसह टोळक्याने जीवे मारण्याच्या उद्देशाने हल्ला केल्याची घटना सोमवारी (दि.९) रात्री ९.२० ते ९.५० च्या दरम्यान घडली आहे. या मारहाणीत भाजप पदाधिकारी निलेश भाऊसाहेब सातपुते (केडगाव, अहमदनगर) जखमी झाले असून त्यांच्यावर शहरातील खाजगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात माजी नगरसेवक विजय मोहन पठारे, राजेंद्र मोहन पठारे, प्रशांत बारस्कर, अजय राजु पठारे, विजय राजू पठारे, आकाश औटी, मयुर चावरे, सन्नी भूजबळ, राहुल झेंडे, गितेश ऊर्फ भैया पवार, राकेश टोकळ, परशुराम बुचाळे, सोनु परदेशी, आकाश सांगळे, विशाल दळवी, अंशु चव्हाण, अजय बुचाळे (सर्व रा.अहमदनगर) या १७ जणांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पुणे–नगर महामार्गावरील हॉटेल रंगोलीच्या पाठीमागे फिर्यादी सातपुते यांचे जागेवर पठारे यांनी बांधलेल्या अवैध बांधकामाबाबत दिलेल्या तक्रार अर्जाचा राग मनात धरुन आरोपी टोळीने कट रचून जिवे ठार मारण्याचे उद्देशाने घातक हत्याराने फिर्यादी यांच्यावर हल्ला केला. तसेच त्यांच्या गळ्यातील सोन्याची साखळी देखील जबरदस्तीने ओरबाडून नेली असल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे. जखमी भाजप पदाधिकारी निलेश भाऊसाहेब सातपुते याच्यावर नगर मधील खाजगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत. त्यांनी मंगळवारी सकाळी दवाखान्यात उपचार सुरु असताना पोलिसांना जबाब दिला असून पोलिसांनी या जबाबावरुन १७ जणांच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १०९, ११९ (१), ११८ (१), ११५ (२), ६१ (२), ३५१ (२), ३५२, १८९ (२) (४) (३), ५९१ (२) (३), १९० प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी पुढील तपास पोलीस करत आहे.

दरम्यान घटनेची माहिती मिळताच पोलिस अधिक्षक राकेश ओला, शहर विभागाचे पोलिस उपअधीक्षक अमोल भारती, कोतवालीचे पो.नि. प्रताप दराडे, महिला स.पो.नि. योगिता कोकाटे, उपनिरीक्षक महेश शिंदे, के.एस.कपिले यांच्या सह पोलिसांचा मोठा फौजफाटा घटनास्थळी दाखल झाला होता. शहरातील भाजपाचे पदाधिकारी यांनी ही घटनास्थळी व रुग्णालयात गर्दी केली होती.

जागेच्या ताबेमारीवरुन सातपुते कुटुंबियांवर 'पूर्वनियोजित हल्ला'

लँड माफियांवर कडक कारवाई करा : भाजपाची पोलीस अधिक्षकांकडे मागणी

नगर – सोमवारी सायंकाळी केडगाव येथे भाजपाचे मंडल अध्यक्ष निलेश सातपुते त्यांच्या पत्नी अर्चना सातपुते व परिवारातील सदस्यांवर गुंड प्रवृत्तीच्या हल्लेखोरांनी अमानुषपणे हल्ला करुन सर्वांना गंभीर जखमी केले आहे. ही घटना अत्यंत गंभीर असून, हल्लेखोरांनी सातपुते कुटुंबीय संपवण्यासाठीच हा हल्ला केला आहे. शहराल नागरिकांच्या जमिनींवर हे लँड माफिया सरासर्पणे ताबे मारत आहेत. सोमवारी केडगावमध्ये घडलेली घटनाही जमिनीवर ताबा मारण्यासाठीच घडली आहे. एकूणच नगर शहरात गेल्या काही वर्षात असे ताबामारीचे प्रकार मोठ्या प्रमाणावर वाढले असून, त्यातून मारहाणी, हत्यादेखील झाल्या आहेत. शहरात गुडांनी मोठ्या प्रमाणात थैमान घातले असून, कालची ही घटना त्याचाच एक भाग आहे. त्यामुळे पोलीस प्रशासनाने शहरातील गुंड प्रवृत्तीचा बंदोबस्त करावा. केडगावमधील दहशत कमी होण्यासाठी या घटनेतील आरोपींना तातडीने पकडून त्यांच्यावर कडक कायदेशीर कारवाई करावी. जेणेकरुन सर्वसामान्य नागरिक सुरक्षितपणे जगता येईल, अशी मागणी शहर भाजपच्या शिष्मंडळाने जिल्हा पोलीस अधिक्षक राकेश ओला यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.

शहर भाजपाचे जिल्हाध्यक्ष ॲड. अभय आगरकर यांच्या नेतृत्वाखाली भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी आज सकाळी पोलीस अधिक्षकांना निवेदन दिले. यावेळी ज्योती सातपुते यांनी प्रत्यक्ष घडलेल्या घटनेची सविस्तर माहिती पोलीस अधिक्षकांना दिली. त्या म्हणाल्या, सातपुते कुटुंबीयांवर काही गुंड हल्ला करणार असल्याची माहिती घटना घडण्याआधी मी केडगाव पोलीस स्टेशनला दिली होती. मात्र तेथील महिला कर्मचाऱ्यांनी मी केलेला फोन गंभीर्यानेने न घेतल्याने आमच्यावर हा हल्ला झाला आहे. ॲम्युलन्समधून आलेल्या मारेकऱ्यांनी **(पुढील मजकूर व छायाचित्र पान २ वर)**

नगर शहरामध्ये नव्याने सुरु होणाऱ्या
भव्य सुवर्णदालनासाठी
पाहिजेत
सेल्समन सेल्सगर्ल 30 जागा
2-3 वर्षांचा अनुभव आवश्यक
ऑफिसबॉय 5 जागा
किमान १०वी पास
आकर्षक पगार आणि इन्सेन्टिव्ह
खालील पत्त्यावर अर्जासह समक्ष भेटा
पोखरणा ज्वेलर्स
पोखरणा हाऊस, नवीपेठ, अ.नगर

।। कुलस्वामिनी प्रसन्न ।।
शेअरिंग कॅब डेली सर्व्हीस
नगर–पुणे–नगर
आता आपल्या शहरातुन

वेळापत्रक
▪ नगर वेळुन स. ७,८,९ व दुपारी २.००
▪ पुणे वेळुन स.११,१२,२ व सायं.५ वा
Ac Xccent / WegonR / Dzire
प्रत्येक वेळेस निरजंतुकीकरण
मर्यादित ३ सिट्स
पिकअप पॉईंट – निलायम चौक, झोपडी कॅन्टीन, सारडा क्लिनिक, दत्त सॅल्स चौक,कलेक्टर चौक,हेडगार
पुणे ड्रॉप – वाडीरत्नाजी, सारसी बायपास, हरेकाळ.
नवीन रिक्वेस्टिंग बसवलेत. बुकिंग आवश्यक
अमर-प्रेम हॉलेजेस
ऑफिस- बिंदोरोड,अ.नगर
9657746555/ 9226399555

वाढलेल्या
वजनाने
त्रस्त आहात?
वजन कमी
करणे झाले
सहज शक्य

7020025541

EARTH's Green Library
Greenery for Every Space
Fresh Environment with Indoor Plants
Get a Plant Today!
▪ Potted Planters
▪ Premium Planters
▪ Garden Accessories
▪ Garden Furniture
▪ Garden Lightings
Opp. Ramadevi Temple, Next to Kamada Machine Tools, Zopadi Canteen, Savedi, AHMEDNAGAR - 414 003
Amit Sanklecha
99231 43334
Website : greenlibrary.in

जैन सोशल फेडरेशनद्वारा संचलित
आनंदऋषिजी हॉस्पिटल अँण्ड मेडिकल रिसर्च सेंटर
शिबीर स्थळ : १२४, आनंदऋषिजी मार्ग, अहमदनगर – ४१४ ००१. फोन : ०२४१-२३२०४७३/७४/७५/७६
मोफत तपासणी व सवलतीच्या दरात
कॅन्सर तपासणी शिबीर
शुक्रवार – दि. १३-०९-२०२४, * वेळ : सकाळी १० ते २
तोंडाचा । स्तनाचा । फुफ्फुसाचा । आतड्याचा । लिव्हरचा ।
स्वादुपिंड । गर्भाशय इ. कॅन्सर रोगावर शस्त्रक्रिया व उपचार
डॉ. अनिकेत शिंदे
(कॅन्सर सर्जन) MBBS, MS, DrNB
रेडिएशन थेरपी आणि केमोथेरपी उपचार व मार्गदर्शन
जनरल शस्त्रक्रिया शिबीर
शुक्रवार – दि. १३-०९-२०२४, * वेळ : सकाळी १० ते २
तज्ञ डॉक्टर
जनरल सर्जन, लॅप्रोस्कोपीक सर्जन
डॉ.आर.एन. पांडे • डॉ. भास्कर जाधव
* लॅप्रोस्कोपी पोटावरील जागेचे, बेंबीचे ऑपरेशनच्या जागेतील (Inguinal) हार्नियाची शस्त्रक्रिया रु. 10000/- * पित्ताशय काढणे रु. 15000/-
* स्त्रीयांची गर्भाशयाची पिशवी काढणे (हिस्ट्रेक्टॉमी) रु. 10000/-
* स्टॅपलर/लेझर पाईल्स शस्त्रक्रिया रु. 15000/-
* ॲपेंडिक्स ऑपरेशन रु. 6500/-
* स्त्रीयांचे बिजांड कोशावरील गाठी शस्त्रक्रिया रु. 5000/-
* स्त्रीयांचे व्यंधत्वाची तपासणी करीता गर्भनलिकेची ट्युबल पेटेन्सी रु. 2000/-
* लॅप्रोस्कोपी स्त्रीयांचे कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया रु. 3000/-
टिप : वरील शस्त्रक्रिया पॅकेजेस मध्ये औषध व आय.सी.यु. चा खर्च वेगळा असेल.
कान, नाक, घसा शिबीर
शुक्रवार – दि. २०-०९-२०२४, * वेळ : सकाळी १० ते २
ई.एन.टी. सर्जन
डॉ. सुकेशिनी गाडेकर (ई.एन.टी.सर्जन)
डॉ. अतुल तुपे (एम.एस. ई.एन.टी.सर्जन)
कान, नाक, घसा रोगावर उपचार, मार्गदर्शन व शस्त्रक्रिया
घशाच्या एन्डोस्कोपीची सुविधा
* ॲलर्जी, घोरणे, चक्कर येणे, श्वास धेण्याची समस्या, बोलण्यात समस्या व इतर आजारांवर उपचार.
दंतरोग उपचार शिबीर
शनिवार – दि. २८-०९-२०२४, * वेळ : सकाळी १० ते २
तज्ञ डॉक्टर
डॉ. अर्पणा पवार, डॉ. प्राची गांधी,
डॉ. स्वराज ठोले (ओरल सर्जन)
मेटलकॅप रु. 1,000/-, सिरॅमिक कॅप, रु. 1,500/-, 2,500/-,
रूट कॅनल रु. 2,000/-, ते 3000/-
दातांची कवळी बसवणे – (3 Types Denture) - रु. 8,000/-, 10,000/-,14,000/-
दात साफ करणे (Scaling) रु. 500/-, दातांमध्ये सिमेंट भरणे रु. 500/-
नांव नोंदणी आवश्यक * औषध खर्च वेगळा
हायटेक पॅथोलॉजी लॅब व ३५ अत्याधुनिक डायलेसीस मशिनद्वारे सेवा उपलब्ध.
24 तास आपल्या सेवेत आनंदऋषीजी ब्लड बँक
डिजिटल एक्सरे रू. 250/-
सोनोग्राफी रु. 800/-
सिटीस्कॅन रू. 1250/-
एम.आर.आय. रू. 2500/-

।। चौथे पुण्यस्मरण ।।

स्व.अनिता अशोक काबरा
स्व.दि.११/०९/२०२०
कष्टातुन संसार फुलविला, उरली नाही
साथ आम्हाला, आठवण येते क्षणा-क्षणाला..
आज हि तुमची पाहतो वाट यावे पुन्हा जन्माला
आपल्या पवित्र स्मृतिस
भावपुर्ण श्रध्दांजली
* शोकाकुल *
समस्त काबरा परिवार
सागर एजन्सी
स्वस्तिक मार्ट, अ.नगर

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्मिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

हे आदिमा.. हे अंतिमा.. शेवटी ना शेष...

अनंतफणा असलेल्या सर्पाच्या वेटोळ्यावर श्री नारायण पहुडलेला आहे. या सर्पाला आदि-अनंत-शेष म्हणतात अन् त्याचा संबंध काळाशी आहे.

आदि म्हणजे सर्वप्रथम, अनंत म्हणजे अमर्याद आणि शेष म्हणजे बाकी, उरलेला. ही नावे काळाच्या ३ तऱ्हा दर्शवतात. पहिली झोपेतून उठताना, दुसरी पूर्ण जागेपणी व तिसरी झोपेत असताना...

आपण जेव्हा झोपेतून जागे होतो तेव्हा आपल्याला वेळेचे भान येते. ती असते आदि-प्रथम जाण. गणिती भाषेत पहिला आकडा १ असतो. त्याचाच प्रतिनिधी. जेव्हा आपण पूर्णपणे जागे होतो तेव्हा आपल्याला अगणित प्रकारे जगाची जाणीव होत राहते. हा असतो अनंत. सर्वात शेवटची अनुभूती.

आपण गाढ झोपेत असतो व स्वप्ने पाहात नसतो तेव्हा आपणास काळाचे भान नसते म्हणून जगाचेही ज्ञान नसते. कशाचेच अस्तित्व जाणवत नसते त्यावेळी जी बाकी उरते ती म्हणजे काही नाही शेष - म्हणजेच गणितात दिल्याप्रमाणे शून्य हा आकडा.

म्हणूनच विष्णूची शय्या असलेल्या सर्पाचे आदि-अनंत-शेष हे नाव आपल्या सर्वांच्या दिनचक्रात येणाऱ्या ३ अवस्थांकडे लक्ष वेधून घेते. जागे येणे, जागे असणे आणि निद्रा या त्या ३ अवस्था. यात आवड असणाऱ्यांनी देवदत्त पटनायक प्रस्तुत विष्णूची ७ रहस्ये हे पुस्तक जरूर वाचावे.

वाचनीय मननीय मेरणादायी अक्षरधन

"मुसाफिर"-९८२२०२०६९१

केडगाव बायपास रोडवर युवकावर प्राणघातक हल्ला

चौघांविरोधात पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल; तिघांना पकडले

नगर - उधार दिलेले पैसे परत मागितल्याचा रागातून चार जणांच्या टोळक्याने एकास अमानुष मारहाण करत डोक्यात दगड घालून त्याचा खून करण्याचा प्रयत्न केल्याची घटना रविवारी (दि.८) रात्री ११.३० च्या सुमारास केडगाव बायपास रस्त्यावर टोल नाक्याजवळ घडली. प्रतिक विलास चव्हाण (वय २४, रा. वडगाव गुप्ता) असे जखमी युवकाचे नाव आहे. त्याच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. चव्हाण यांच्या जबाबावरून चौघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

केडगाव बायपास रोडवर युवकावर खुनी हल्ला करणाऱ्या तिघा आरोपींना पकडल्या नंतर त्यांच्या समवेत कोतवाली पोलिसांचे पथक.

गुन्हा दाखल होताच यातील तिघांना पोलिसांनी पकडले आहे.

संदीप थोरात, कार्तीक संदीप थोरात (दोघे रा. बोल्हेगाव), भैय्या गुरुंडा, रोहित चाबुकस्वार (पूर्ण नाव पत्ता नाही) यांच्या विरोधात हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संदीप थोरात याने चव्हाण याला फोन करून माझा मुलगा कार्तीक हा तुझ्याकडे येईल व तुझ्या पैशाचा व तुझा हिशोब करेल, असे सांगितले. त्यानंतर थोडावेळ वेळात तिघे दुचाकीवरून आले व त्यांनी तू पैसे का मागतो, असे म्हणत मारहाण सुरू केली. चव्हाण याला खाली पडून मोठा दगड त्याच्या डोक्यात घालण्याचा प्रयत्न केला. चव्हाण बाजूला सरकल्याने तो वाचला. चव्हाण याचा मित्र राहुल गुरव हा तेथे आला व त्याने त्याला सोडवण्याचा प्रयत्न केला. मात्र, इतर आरोपींची चव्हाण याच्या डोक्यात दगड मारला व लाकडी काठीने मारहाण केली. तुला आज मारल्ल्या टाकतो, असे म्हणत त्याच्या डोक्यात प्लास्टिकची खुर्ची मारली, असे फिर्यादित म्हटले आहे.

सदरची पूर्ण घटना सीसीटीव्हीत कैद झाली आहे. उपअधीक्षक अमोल भारती, पोलिस निरीक्षक प्रताप दराडे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. याबाबत सोमवारी (दि.९) रात्री उशिरा चौघांवर गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेवून पो. नि. प्रताप दराडे यांनी गुन्हे शोध पथकातील अंमलदार यांना आरोपींचा शोध घेणेकामी सुचना देवून रवाना केले. त्यानंतर अवघ्या काही तासांतच गुन्हे शोध पथकातील अंमलदार यांनी सदर गुन्ह्यातील आरोपी यांचा नगर शहरातील विविध उपनगरात शोध घेवून आरोपी संदिप बाळासाहेब थोरात (वय- ४२), कार्तीक संदिप थोरात (वय १८,रा. साईनगर, भारत बेकरी मागे बोल्हेगाव) व रोहित संतोष चाबुकस्वार (वय २१, रा. ओम स्वीट पाठीमागे भिंगारदिवे मळा, गुलमोहर रोड, सावेडी) यांना ताब्यात घेतले आहे.

सदरची कारवाई पो. नि. प्रताप दराडे यांचे मार्गदर्शनाखाली स.पो.नि. विकास काळे, गुन्हे शोध पथकाचे अंमलदार ए. पी. इनामदार, दिपक रोहकले, तानाजी पवार, सत्यम शिंदे, नकुल टिपरे, मोहन भेटे, सुजय हिवाळे, सुरज कदम, संकेत धिवर, अनुप झाडबुके, राम हंडाळ यांनी केली आहे.

केडगावमध्ये सातपुते कुटुंबियांवर हल्ला करणाऱ्या लँड माफिया गुंडांवर कडक कायदेशीर कारवाई करावी, या मागणीचे निवेदन शहर भाजपच्या शिष्टमंडळाने जिल्हा पोलीस अधिक्षक राकेश ओला यांना दिले.

जागेच्या ताबेमारीवरुन सातपुते कुटुंबियांवरील पूर्वनियोजित हल्ला

(पान १ वरुन)

अत्यंत क्रूरपणे घरातील पुरुषांना व महिलांना मारहाण केली आहे. त्यांच्याकडे खूप हत्यारे होती. सर्व कुटुंब यामध्ये गंभीर जखमी झाले आहे. घरात मारहाण चालू असतानाही मी पोलिसांना फोन केला होता. पण त्यांनी दखल घेतली नाही.

यावेळी अभय आगरकर यांनी आरोपींवर गंभीर स्वरूपाची कलमे लावून कडक कारवाई करण्याची मागणी केली. पोलीस अधिक्षक राकेश ओला यांनी या घटनेचा पोलीस प्रशासन बारकाईने तपास करत अमूल आरोपींना लवकरच अटक करून कडक कारवाई करण्याचे आश्वासन दिले.

निवेदनात म्हटले आहे कि, सार्वजनिक बांधकाम विभागाने केडगाव लिंक रस्त्यातील अतिक्रमण वेळेत काढले असते तर कदाचित ही घटना टळली असती. परंतु सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी सातपुते कुटुंबियांच्या माणीकडे दुर्लक्ष करत अतिक्रमण हटविले नाही. परिणामी त्यांच्या हलगर्जीपणामुळे ही घडली आहे. ज्या गुंडांकडून सातपुते परिवारावर अमानुष हल्ला करण्यात आला आहे त्यांच्या विरोधात कडक कारवाई करण्यात यावी. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागातील संबंधित अधिकाऱ्यांकडून हे रस्त्यातील अतिक्रमण त्वरीत काढण्यात यावे, त्यासाठी लागणारा पोलीस बंदोबस्त देण्यात यावा.

यावेळी भाजपा विधानसभा निवडणूक प्रमुख महेंद्र गंधे, माजी अध्यक्ष वसंत लोढा, सरचिटणीस सचिन पारखी, प्रशांत मुथा, गोपाल वर्मा, पंडित वाघमारे, शशिकांत पालवे, नितीन शेलार, बाळासाहेब खताडे, विकास घोरपडे, राजु शेलार, झानेबर चिरडे, सुरेश लालबागे, ऋषिकेश आगरकर, अनिल निकम, प्रकाश जोशी, हर्षल बोरा, महेश गुगळे, बाळासाहेब भुजबळ, साहिल शेख, साहेबराव विघाते, अशोक गायकवाड, चंद्रकांत पाटोळे, प्रवीण ढोणे, मयूर बोचूघोळ, ज्योती सातपुते, शुभांगी झरेकर, अविनाश साकला, दत्ता गाडळकर, कावळे, सोमनाथ जाधव, रियाज कुरेशी, सुरेखा खैरे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

गळफास घेऊन एकाची आत्महत्या

नगर - निंबळक (ता. नगर) येथे राहत्या घरी गळफास घेऊन एकाने आत्महत्या केली. शरद बाबासाहेब ढोरजकर (वय ५३, रा. निंबळक, ता. नगर) असे मयत झालेल्यांचे नाव आहे. ही घटना ८ सप्टेंबरला घडली. याप्रकरणी एमआयडीसी पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

रविवार दि. ८ रोजी सकाळी साडेसात वाजता शरद ढोरजकर यांनी राहत्या घरी कपडे सुकविण्यासाठी बांधलेल्या दोरीला ओढणीच्या सहाय्याने गळफास घेतला. या घटनेनंतर त्यांचे जावई अजय आनंद वाबळे (रा. पिंपळगाव वाघा, ता. नगर) यांनी त्यांना औषधोपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. जिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. अक्षय ढगे यांनी उपचारापूर्वीच ते मयत असल्याचे सांगितले. पोलिसांनी अकस्मात मृत्याची नोंद केली असून पुढील तपास एमआयडीसी पोलिस करीत आहेत.

'अर्बन बँक कर्ज घोटाळ्या'तील कर्जदाराला अटक; आर्थिक गुन्हे शाखेची प्रोफेसर चौक परिसरात कारवाई

नगर - अर्बन बँकेच्या कर्ज फसवणूक प्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेने कर्जदार केशव भाऊसाहेब काळे (वय ५०, रा. सारोळा कासार, ता.नगर) यास प्रोफेसर चौकातील जॉगिंग ट्रॅक परिसरातून ताब्यात घेतले. सोमवारी सायंकाळी उशिरा ही कारवाई करण्यात आली. रात्री उशिरापर्यंत त्यांच्या अटकेची कारवाई सुरू होती.

सुमारे २९१ कोटी रुपयांच्या फसवणूक प्रकरणी कोतवाली पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखेमर्फत सुरू आहे. फॉरेन्सिक अहवालात आलेल्या आक्षेपानुसार आर्थिक गुन्हे शाखेकडून तपासणी करून कारवाई केली जात आहे. कर्जदार केशव काळे याच्या कडे ३३ कोटींचे कर्ज आहे. तो नगर येथील प्रोफेसर कॉलनी चौक परिसरात आल्याची माहिती मिळताच सहाय्यक निरीक्षक युवराज आठरे व सोमनाथ दिवटे यांच्या पथकाने त्याला ताब्यात घेतले.

रात्री उशिरापर्यंत अटकेची कारवाई सुरू होती.

आनंदीबाजार येथून मोटारसायकलची चोरी; गुन्हा दाखल

नगर -शहरातील आनंदी बाजार परिसरात गौरी घुमट जवळ घरासमोर लावलेली हिरो कंपनीची एच एफ डिलक्स मोटारसायकल (क्रं.एम.एच.१६ बी.एक्स. ३१०६) अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे. याबाबत ओंकार मल्हारी शिंदे (रा.म्हाळसा निवास, तुळजा भवानी मंदिराजवळ, गौरी घुमट, आनंदीबाजार) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरुद्ध बी.एन.एस.२०२३ चे कलम ३०५ (बी) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

भिमराज बिब्रा यांचे अल्प आजाराने निधन

नगर - येथील सावेडीच्या पाईपलाईन रोड भागातील रहिवासी भिमराज रामभाऊ बिब्रा (वय ८०) यांचे ९ सप्टेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ते पद्मशाली वधू-वर सूचक मंडळाचे मार्गदर्शक होते. देवीदास बिब्रा व राजेंद्र बिब्रा यांचे ते वडील होत.

सौ. छायाबाई गांधी यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर - बोल्हेगावफाटा, नागापूर येथील रहिवासी सौ. छायाबाई अशोक गांधी (मढीवाला, वय ६६) यांचे ७ सप्टेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पती, १ मुलगा, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. राजेंद्र अशोक गांधी यांच्या त्या मातोश्री व सुरेश शांतीलाल पटवा यांच्या त्या सासू होत.

शंकर सकट यांचे हृदयविकाराने निधन

नगर - केडगावच्या वैष्णवनगर मधील रहिवासी शंकर श्रीपाद सकट (वय ५६) यांचे १ सप्टेंबर रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर केडगाव येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, ३ मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. अभिजित सकट व अक्षय सकट यांचे ते वडील होत.

जनार्धन हिंगणगावकर यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर - नगर येथील सराफ व्यावसायिक जनार्धन काशिनाथ हिंगणगावकर (वय ७२) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात २ मुले, ३ मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. अरुण जनार्धन नगरकर (कोपरगाव) आणि विजय जनार्धन हिंगणगावकर, (नगर) यांचे ते वडील होत.

विनोद लिगाडे यांचे अल्पशा आजाराने निधन

छत्रपती संभाजीनगर - घाटनांद्रा (ता. सिल्लोड, ह.मु. छत्रपती संभाजीनगर) येथील रहिवाशी विनोद बबनआप्पा लिगाडे यांचे ५ सप्टेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले आहे.

त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, जावई, भाऊ, नातवंडे असा परिवार आहे.

शहरात वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कारवाई करा : जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

नगर - वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कारवाई करावी आणि अधिक अपघातप्रवण क्षेत्रातील अपघात कमी करण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, असे निर्देश जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित रस्ता सुरक्षा समितीच्या बैठकीत दिले.

बैठकीस मनपा आयुक्त यशवंत डांगे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता भरतकुमार बाविस्कर, पोलीस उपअधीक्षक अमोल भारती, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद सगरे आदी उपस्थित होते.

रस्ता सुरक्षा समितीच्या बैठकीत बोलताना जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ व अधिकारी.

जिल्हाधिकारी म्हणाले, महामार्गावर अपघात टाळण्यासाठी वाहनांच्या वेगाला मर्यादा घालणे आवश्यक आहे. वेगावर नियंत्रण ठेवण्यासाठी कॅमेरे लावण्यात यावे. किशोरवयीन मुलांकडून होणाऱ्या वाहतूक नियमांच्या उल्लंघनाबाबत कारवाई करावी, तसेच त्यांचे समुपदेशनही करावे. रस्त्याच्या बाजूला असलेले धोकादायक फलक त्वरित काढण्यात यावे. रस्ता दुभाजकांची आवश्यक दुरुस्तीची कामे करण्यात यावीत. रस्ता दुभाजक अनधिकृत तोडणाऱ्यांवर गुन्हे दाखल करावे.

शाळा आणि महाविद्यालयांमधून वाहतूक नियमांबाबत प्रबोधन करण्यात यावे. वारंवार तक्रारी असलेल्या शैक्षणिक परिसरात स्वतंत्र पथक नियुक्त करावे. शालेय परिवहन समितीच्या बैठकीत रस्ता सुरक्षा नियमांबाबत माहिती द्यावी.

बैठकीत जिल्ह्यातील अपघातप्रवण क्षेत्राबाबत रेझिलियंट इंडिया या अशासकीय संस्थेचे प्रतिनिधी राजीव चौबे यांनी सादरीकरण केले. यातील अधिक गंभीर ब्लॅक स्पॉटबाबत तातडीने उपाययोजना सुरू कराव्यात, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

बैठकीत शासकीय आणि अशासकीय सदस्यांनी रस्ता सुरक्षेबाबत विविध सूचना केल्या.

श्रमीकनगर, पाईपलाईन रोड, सावेडी येथील नरेश भुमय्या कोटा यांनी आपल्या घरी गणेशोत्सव निमित्त राम मंदिराचा देखावा केला आहे. देखावा मध्ये त्यांनी अयोध्यातील राममंदिर स्टआऊट मे उभारले असून त्यामाने प्रभू श्रीराम आहेत व शेजारी गणेश मूर्ती आहे तर पार्श्वभूमीवर हनुमान आपली छाती फाडून राम-सीता दाखविणे चित्र आहे. गावाच्याच सहकारात जय श्रीराम लिहिलेले आहे, बरली सावित्रीबाई फुलेचा फोटो आहे. यावर आकर्षक अशी लाइटिंग करून वेगवेगळे रंग दाखवले जात आहेत.

एमपीएससी परिक्षेमध्ये मोनिका झरेकर राज्यात दुसरी

नगर - महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग (एमपीएससी) मार्फत नुकत्याच झालेल्या वैद्यमापन निरीक्षक शास्त्र ह्या राजपत्रित अधिकारीपदी मोनिका बाळासाहेब झरेकर मुलीमधून राज्यात दुसरी आली आहे. मोनिका झरेकर ही खातगाव टाकळी (ता.नगर) येथील रहिवासी आहे. नौदलातील अधिकारी बाळासाहेब झरेकर यांची कन्या आहे.

तिची यापूर्वी राज्य करनिरीक्षक, सहायक कक्ष अधिकारी (मंत्रालय) या पदांसाठी सुद्धा निवड झाली होती. राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार विजेते बबनराव झरेकर यांची पुतणी, अहमदनगर जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सेवानिवृत्त) सुरेश शिंदे यांची भाची आहे.

आंतरशालेय स्पीड स्केटींग स्पर्धेत कार्तिक बनकरचा प्रथम क्रमांक

नगर - जिल्हा अधिकारी कार्यालय व अहमदनगर महानगरपालिका आयोजित आंतर शालेय स्पीड स्केटिंग स्पर्धेत सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलच्या कार्तिक दिपक बनकरने प्रथम क्रमांक मिळविला. त्याची पुणे विभागीय स्पर्धे साठी निवड झाली आहे. त्याचे संस्थेचे अध्यक्ष राम मेघानी, प्राचार्या गीता तांबे, उपप्राचार्या कंचन पपडेजा, मुख्याध्यापिका गोदावरी कितांनी यांच्यासह पालक वर्गाने अभिनंदन केले. या स्पर्धेसाठी अमोल धोपावकर सर, नयन तुपे मॅडम, शुभम करपे सर, सचिन डोंगर सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

जिल्हा रुग्णालयातून काढले बनावट अपंग प्रमाणपत्र

तीन कर्मचाऱ्यांसह सात जणांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल

नगर - जिल्हा रुग्णालयातील अज्ञात कर्मचाऱ्यांना हाताशी धरून कोणतीही वैद्यकीय तपासणी न करता, रुग्णालयात नोंद न करता ऑनलाईन पोर्टलवार माहिती भरली. त्याद्वारे कर्णबधीर असल्याचे बनावट अपंग प्रमाणपत्र मिळवल्याचा धक्कादायक प्रकार जिल्हा रुग्णालय प्रशासनाच्या चौकशीतून समोर आला आहे.

या प्रकरणी जिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ. साहेबराव डवरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पाथर्डी तालुक्यातील चौघांसह जिल्हा रुग्णालयातील ३ कर्मचारी अशा ७ जणांवर तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सागर भानुदास केकान (रा. पागोरी पिंपळगाव, ता. पाथर्डी), प्रसाद संजय बडे (ता. पाथर्डी), सुदर्शन शंकर बडे (रा. येळी, ता. पाथर्डी), गणेश रघुनाथ पाखरे (रा.माणिक दौंडी, ता. पाथर्डी) यांच्या सह जिल्हा रुग्णालय कर्मचारी पतसंस्थेत काम करणारा शिपाई योगेश बनकर, जिल्हा रुग्णालयात काम करणारा कंत्राटी कर्मचारी गणेश गोत्राळ व अन्य एक अज्ञात कर्मचारी अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत.

सावली दिव्यांग संघटनेचे अध्यक्ष बाबासाहेब महापुरे यांनी बनावट प्रमाणपत्राबाबत जिल्हा शल्यचिकित्सकांकडे तक्रार केली होती. चौघांनी जिल्हा रुग्णालयातून कर्णबधीर असल्याची दिव्यांगत्वाची बनावट प्रमाणपत्र घेतल्याची तक्रार त्यांनी केली होती. त्यानुसार जिल्हा रुग्णालय प्रशासनाने केलेल्या पडताळणीमध्ये दिव्यांग प्रमाणपत्र दिलेल्या दिवशी रजिस्टरला कोणतीही नोंद नसल्याचे व वैद्यकीय तपासणी अहवाल कागदपत्रे उपलब्ध नसल्याचे समोर आले. पोर्टलवर मात्र, चौघांच्याही दिव्यांग प्रमाणपत्राची नोंद आढळली. त्यानंतर जिल्हा रुग्णालय प्रशासनाने फसवणूक झाल्याची फिर्याद दिली आहे.

चौघांनी शासकीय योजनांचा फायदा घेण्याच्या उद्देशाने रुग्णालयातील अज्ञात कर्मचाऱ्यांना हाताशी धरून जिल्हा रुग्णालयाचा आयडी व पासवर्ड वापरून बनावट नोंदी केल्या व त्याद्वारे प्रमाणपत्र तयार करून घेतल्याचे यात म्हटले आहे. दरम्यान, जिल्हा रुग्णालयाच्या चौकशीनंतर बनावट प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी मदत करणाऱ्या संशयित कर्मचाऱ्यांची माहितीही रुग्णालय प्रशासनाने पोलिसांना दिली आहे. अधिक तपास पोलिस उपनिरीक्षक शैलेश पाटील हे करीत आहेत.

गृहिणी

आरोग्य

आरोग्यदायी कापूर

कापूर आपल्या अँटिबायोटिक आणि अँटीफंगल गुणधर्मामुळे पूजा-हवन साहित्याच्या व्यतिरिक्त आरोग्यासाठी देखील फायदेशीर आहे. जर आपण याचा समावेश सौंदर्य प्रसाधनांमध्ये देखील केलात, तर आपल्या बऱ्याचशा समस्या नाहिशा होतील. कापूर जेवढे लामदायक आहे तेवढेच अधिक मूल्यवान आहे कापराचे तेल.

पाककला

खमंग डाळवडे

साहित्य : हरभरा डाळ, तूर डाळ, उडीद डाळ प्रत्येकी अर्धी वाटी व एक वाटी मूग डाळ, आवश्यकतेनुसार. कणीक, दही, एक चमचा तेलाचे मोहन, आवडीनुसार तिखट-मीठ, लसूण व कांदा, अर्धी वाटी भिजवलेली मसूर डाळ किंवा हरभरा डाळ, तळण्यासाठी तेल.

कृती : चारही डाळी धुऊन सावलीत वाळवून त्याचा भरडा काढावा. यापैकी वाटीभर भरडा घेऊन त्यात तेलाचे मोहन, कणीक, दही व इतर साहित्य घालून घट्ट मीठ भिजवावे. त्याचे मेदूवड्याप्रमाणे वडे तयार करून भिजलेल्या डाळीत घोळवावेत आणि तेलात तळावेत. प्रथम तेल तापवून नंतर मंद आचेवर तळावे म्हणजे वडे आत कच्चे राहत नाहीत. तसेच डाळही चुरचुरीत होते.

सॉस किंवा आवडीच्या चटणीबरोबर खायला द्यावे.

सौंदर्य

डोळ्यांचे आरोग्य

✻ उन्हातून परतल्यानंतर डोळ्यांवर ४-५ मिनिटे गुलाबपाण्यात भिजवलेला कापूस ठेवा.

✻ स्वच्छ कपडा पाण्यात भिजवून डोळ्यांवर ठेवल्यासही जळजळ थांबते.

वास्तू

घराच्या मध्यभागात लावलेले क्रिस्टलचे झुंबर शुभ असते.

सल्ला

भाजी शिजवण्यासाठी भाजीचे प्रमाण पाहून त्यानुसारच भांडे घ्यावे.

संकलक : अँड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.

दैनिक पंचांग

बुधवार, दि. ११ सप्टेंबर २०२४

गौरी पूजन, दुर्गाष्टमी, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, भाद्रपद शुक्लपक्ष, ज्येष्ठा २१।२२, सूर्योदय ०६ वा. २९ मि. सूर्यास्त ०६ वा. ३१ मि.

राशिभविष्य

मेष : घराची डागडुजी करायची असल्यास काही अनपेक्षित कारणे विघ्न आणतील.

वृषभ : प्रत्येक व्यक्तीशी मृदू आणि सौम्य वागण्याचा प्रयत्न करा एखादी प्रणयपूर्ण संध्याकाळ आपल्यासाठी आनंद आणेल.

मिथुन : आपण कुणापासून प्रेरीत व्हाल. आपला जोडीदार आपल्याबरोबर राहील पलापळ देखील अधिक राहील.

कर्क : आजची संध्याकाळ आपणासाठी फारच रोमँटिक आणि अर्थपूर्ण होण्याची शक्यता आहे. पैसा खर्च होईल.

सिंह : अकस्मात आलेल्या परिवर्तनांमुळे आपल्या जीवनाला नवीन दिशा मिळेल.

कन्या : काही वेळ समस्या निवारणासाठी आणि आत्मविश्वासाच्या वाढीसाठी काढाल.

तूळ : आपल्या विचारांच्या सकारात्मक लहरींमुळे इतर लोक प्रभावीत होतील.

वृश्चिक : अनिर्णित राहीलेली प्रकरणे नवे प्रश्न उभे करतील.

धनु : काही विशेष करण्याचा प्रयत्न करा. आज रात्री आपणास प्रेमात अत्यंत सुख मिळेल.

मकर : सहकाऱ्यांशी होणारे वैचारिक मतभेद टाळा.

कुंभ : आपण वेळेचा सदुपयोग केल्याने आपणास चांगले यश मिळू शकते.

मीन : आपला कार्यक्षेत्रातील किंवा आपल्या व्यापारातील इतर लोकांशी व्यवहार करताना सावधगिरी बाळगाल.

संकलक : अँड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.

हसा आणि शतायुषी व्हा!

'वय'

मित्र : ''काय रे किशोर, तुझे वय किती?''
किशोर : ''अठरा वर्षे.''
मित्र : ''आणि तुझ्या बापाचे वय किती?''
किशोर : ''अर्थात अठरा वर्षे.''
मित्र : ''अरेऽऽ तुझे वय अठरा आणि बापाचे वय अठरा हे कसे काय?''
किशोर : ''अहोऽऽ ज्या वेळी मी जन्माला आलो त्या वेळीच तो माझा बाप झाला ना – म्हणून माझे वय अठरा, बापाचे वय अठरा.''

...चला करू स्पर्धा परीक्षांची तयारी

✻ चंद्राचे वस्तुमान पृथ्वी पेक्षा किती पटीने असते – १/१८
✻ हा देश सार्क संघटनेचा सभासद नाही – चीन
✻ या शहरास भारताची सिलीकॉन व्हॅली म्हणतात – बंगळुरु
✻ आंतरराष्ट्रीय ओझोन दिवस – १६ सप्टेंबर

संदर्भ – 'कॉम्पिटिशन सक्सेस (जनरल नॉलेज) इंग्रजी मासिक मराठी अनुवाद – अरविंद ब्राम्हणे, भिंगार मो. ९४०३७३४२८१

शब्दगंध क्र. ७००८ सौ.शैलजा कुलकर्णी

शब्दगंध क्र. ७००७ चे उत्तर



आडवे शब्द :- १) गोंधळाची अवस्था; अराजक ६) फेरफार; चेंज ७) आठवडाभातील सुट्टीचा दिवस १०) 'नारायण नारायण' असा उद्घोष करीत तिन्ही लोकी फिरणारा ब्रह्मर्षी ११) कापडी भिंत; पडदा १२) घोडद्याला नियंत्रणात ठेवणारी दोरी १३) झाकण असलेले भांडे १६) अप्रीत आहुती टाकणे; हवन १८) जेल; बंदिशाला; तुरुंग १९) 'प्रेमळ; ममतालू २०) बी पेरण्याचे औत; तिफण २२) ओकारी; उलटी; वांती२४) जंगलाला लागलेली आग; दावानल २५) भांडण सोडविणारे त्रयस्थ मंडळ

उभे शब्द :- १) ऐक्याचा अभाव; दुही २) जहाजे थांबण्याचे समुद्राकाठचे ठिकाण ३) पाणथळ किंवा चिखलाची जागा ४) 'डायमंड ज्युबिली'चे मराठी रूप ५) पिसारा फुलविणारा भारताचा राष्ट्रीय पक्षी ८) वाचून; शिवाय ९) लवकर न तुटणारे; लवचीक १४) आळ; आरोप १५) पराजय; अपयश; असफलता १७) एक अतितलम सुती कापड १८) फणसाची एक जात २१) लढाई; लढाईचे मैदान; युद्ध २३) नूतन; नवीन

✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

: संकलक : अँड.सौ. पूजा गुंदेचा

सुविचार : माता म्हणजे मनुष्याच्या जीवनातील गंगाजळ आहे.

मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

माणसाचा मृत्यू झाला हे कसे ठरवतात?

माणसांचा मृत्यू दोन टप्प्यांमध्ये होतो. पहिला टप्पा म्हणजे शारीरिक मृत्यू व दुसरा म्हणजे पेशींच्या पातळीवरील मृत्यू. मेंदू, हृदय व फुफ्फुसे यांचे कार्य पूर्णपणे थांबण्याला शारीरिक मृत्यू असे म्हणतात. शारीरिक मृत्यू झाला तरी देखील शरीरातील काही भागांमध्ये मात्र प्राण शिल्लक असतो. त्यामुळे ते रासायनिक, औष्णिक वा विद्युत संवेदनांना प्रतिसाद देतात. डोळ्यांत मरणानंतर ॲट्रोपीन टाकले, तर बाहुली मोठी होते व फायजोस्टीग्मीन टाकले तर लहान होते. वेगवेगळ्या पेशी व ऊती त्यांना किती प्राणवायू लागतो त्या प्रमाणावर वेगवेगळ्या कालावधीपर्यंत जिवंत राहतात.

ह्या पेशी व पेशींचा समूह मरण्याला पेशींचा मृत्यू असे म्हणतात. यात शरीरातील सर्व पेशी मरायला लागतात व त्याबरोबर शरीर थंड होऊ लागते.

याच बरोबर डोळे, त्वचा व स्नायू यांतही बदल घडून येतात. शारीरिक मृत्यूनंतर सुमारे तीन ते चार तासांत पेशींचा मृत्यू होतो. शरीराचे स्नायू विद्युत संवेदनांनी उत्तेजित झाले नाहीत, तर पेशींच्या पातळीवर मृत्यू झालेला आहे; असे निदान करता येते. काही वेळा पेशींचा मृत्यू झालेला नसल्यास चितेवर ठेवलेल्या प्रेताची हालचाल होऊ शकते. ज्यामुळे खूप गोंधळ उडू शकतो.

इंद्रियारोपणाच्या शस्त्रक्रियेतही पेशींचा मृत्यू व्हायच्या आधी ते इंद्रिय शरीरातून काढावे लागते. यकृत शारीरिक मृत्यूनंतर १५ मिनिटांत, मूत्रपिंड ४५ मिनिटांत, तर हृदय एक तासात काढून घ्यावे लागते. अन्यथा या इंद्रियांचा दुसऱ्याच्या शरीरात रोपण करण्यासाठी उपयोग करता येणार नाही. माणूस एकदा मरतो, हे जरी खरे असले; तरी तो दोन टप्प्यांत मरतो. एकदा शारीरिक पातळीवर, तर एकदा पेशींच्या पातळीवर!

लढता लढता मेलेले बरे

एका गल्लीतला कुत्रा सहज फेरफटका मारावा म्हणून एका दुसऱ्या गल्लीत फिरायला गेला असता हा कोण उपटसुंभ आपल्या हद्दीत घुसला असा विचार करीत त्या गल्लीतली पाच पंचवीस कुत्री त्या कुत्र्याच्या पाठी लागली, तेव्हा भीतीने तो कुत्रा पळू लागला.

पण शेवटी पळून पळून थकल्याने आपण आता यांच्या तावडीतून सुटत नाही. आपण नक्कीच प्राणाला मुकू. तेव्हा यांच्या तावडीत सापडून मरण येणारच असेल तर लढून मेलेले काय वाईट? असा विचार मनात येऊन तो कुत्रा गर्रकन पाठीमागे फिरला आणि मोठमोठ्याने गुरकावून त्या कुत्र्यांच्या कळपावर तुटून पडला. त्याचा तो आवेश पाहून धावून आलेले कुत्रे भीतीने पळून गेले.

तात्पर्य : संकटाचा सामना धैर्याने केल्यास संकटातून सुटका होते.

जीवन चक्र – मृत्यू रहस्य (जीवन की रोशनी)

बल्कि वह प्रभु के बारे में बिल्कुल भी नहीं सोचता ! बच्चे के लिए स्वाभाविक है कि वह अपने माँ-बाप से कभी इस या उस चीज की माँग करे कभी नया खेल कभी नई साइकिल या नया खिलौना आदि-आदि और क्योंकि आध्यात्मिक विषयों में हम सभी शिशु है, यह आश्चर्य की बात नहीं है कि सौ में से निन्यानवें मामले ऐसे होते हैं, जिनमें हम प्रभु से इस या उस वस्तु की माँग करते रहते हैं। वास्तव में, हम प्रायः प्रभु से धन-दौलत, भौतिक सुख, स्वास्थ्य, और अपने बच्चों तथा निकट संबंधियों की भलाई की माँग करते हैं। ऐसी प्रार्थना भी, यद्यपि सांसारिक वस्तुओं के लिये होती है, फिर भी रुहानी तौर से महत्वपूर्ण है।

तो इससे कम से कम यह तो पता लगता है कि हम किसी उच्च शक्ति किसी उच्च सत्ता में विश्वास रखते हैं तथा अंततः यह मानें उसकी शरण में जाने का मार्ग दिखाती है।

इस उच्चतम शक्ति के अस्तित्व को पहचानने से, एक ऐसी शक्ति जो हमारी जरूरतों को पूरा करती है, हमारी आध्यात्मिक यात्रा की शुरूआत हो जाती है। जब हमारी वृद्धि और विकास होता है, तो हमारा ध्यान जाता है, सांसारिक वस्तुओं से हट कर उस अनंत प्रेम तथा संरक्षण की ओर जो यह शक्ति हमें प्रदान करती है। अब हम अपनी आवश्यकताओं के बारे में चिंता करना बंद कर देते हैं, क्योंकि ईसा मसीह के शब्दों में हम यह अनुभव करने लगते हैं, तुम्हारा पिता तुम्हारे माँगने से पहले ही जानता है कि तुम्हारी क्या-क्या आवश्यकताएं हैं।

इस प्रकार हमारा जोर पहले प्रकार की प्रार्थना से दूसरे प्रकार की प्रार्थना पर चला जाता है जो कि शुक्रानै और कृतज्ञता की प्रार्थना है। पहले हम समझते थे कि प्रभु वह है जो हमारी जरूरतों को पूरा करता है पर अब हम मानने लग जाते हैं कि वह परम् पिता है जो हमारी सभी आवश्यकताओं को पहले से ही जानता है, बल्कि हमसे बेहतर जानता है। हमारे रवैये में यह परिवर्तन काफी महत्वपूर्ण है। यह हमारे आध्यात्मिक विकास में एक महत्वपूर्ण अवस्था है। जब कोई इस अवस्था तक पहुंच जाता है, तो उसमें स्वीकार करने तथा समझ की एक नई भावना आ जाती है। प्रभु जो कुछ हमें देता है, इस उसे स्वीकार कर लेते हैं। अन्य लोग क्या कहते हैं, उसे न मान कर हम प्रभु को हमारे लाभ के लिए कार्य करता देखते हैं। जो कुछ प्रभु देता है उसका हम स्वागत ही नहीं करते, बल्कि हम उसके प्रति धन्यवाद और कृतज्ञता से भर जाते हैं।

संसार के अधिकतर धर्म-ग्रंथों में वर्णित प्रार्थनाएँ याचना या शुक्रानै की प्रार्थनाएं ही होती हैं। परन्तु जैसे-जैसे हम विकसित होते जाते हैं तो हम तीसरी प्रकार की प्रार्थना की ओर अग्रसर होते हैं, जिसमें हम प्रभु तक वापिस जाने वाले पथ के लिए सहायता मांगते हैं।

एक बार जब हम प्रभु को जानने की इच्छा भर जाते हैं, तो हम एक ऐसी अवस्था में पहुँचते हैं, जहाँ जो लोग पहले हमारे मित्र या सहचर। धर्म-ग्रंथ हमारे लिए प्रेरणा का एक महान स्त्रोत हो सकते हैं और हमारे विश्वास को सुदृढ़ कर सकते हैं, कि एक देवी शक्ति है जो हम सबकी संभाल करती है। हम यह विश्वास करना भी प्रारंभ कर सकते हैं कि मनुष्य प्रभु से सीधा संपर्क स्थापित कर सकता है परन्तु जैसा कि किसी अन्य क्षेत्र में होता है, छपे हुए शब्द ही काफी नहीं हैं।

हमें एक जीवित पथ-प्रदर्शक की आवश्यकता होती है। जब साधक की प्रार्थना निरंतर बढ़ती जाती है, तो उसमें एक प्रकार की मानसिक वेदना आ जाती है। संत कृपालसिंह जी, हजूर बाबा सावनसिंह जी से मिलने से पहले एक लंबी और यातनाभरी खोज का अक्सर जिक्र किया करते थे। उन्हें अनेक म हापुरुष मिले और उन्होंने अनेक पंथों को आजमाया। परन्तु उनमें से कोई भी उन्हें आंतरिक तसल्ही नहीं दिला पाया कि वह उन्हें उनके लक्ष्य तक पहुंचा देगा। उन्होंने काफी विलाप किया और अत्याधिक मानसिक पीड़ा में उन्होंने प्रभु से प्रार्थना की कि वे उन्हें एक पूर्ण पुरुष तक ले जायें। केवल तब ही उनकी खोज सफल हुई और मनुष्य जीवन का लक्ष्य उन्हें मिला ।

(कृपाल आश्रम, अहमदनगर)

शुद्ध जीवन जीने के मंत्र (शांति)

मानव भूतकाल की अप्रिय घटनाओं को मन में चिपकाए रखता है। व्यर्थ की कल्पनाएं करता रहता है। जिससे अनेक कष्ट, क्लेश और असुविधाओं का सामना करता रहता है। इससे नकारात्मक कल्पनाएं पनपती हैं। समस्याओं से घबराने से काम नहीं चलेगा। उनका उत्साह से सामना करना चाहिये। हम किसी यात्रा के लिये वाहन प्रयोग करते हैं। वाहन को किस गति से चलाएंगे। सुरक्षित गति से चलाएंगे। न अधिक गति न कम गति। जीवन में सफलता के लिये उत्साह की गति कम न होने दो। उत्साह को बल मिलता है ज्ञान से या अच्छी कल्पनाओं से। अगर हम २० पृष्ठ हर रोज अव्यक्त मुरली या किसी अन्य साकारात्मक पुस्तक के प्र उत्साह कभी कम नहीं होगा। अगर हम अढाई घंटे बैठकर साधना का अभ्यास करें। उत्साह कभी कम नहीं होगा। साधना साकारात्मक कल्पना ही है। अगर हम दस हजार कर परमात्मा के गुण कि आप शांति के सागर है का सिमरन हर रोज करें तो उत्साहसा जब कभी भी उत्साह कम हो तो तुरंत पढ़ना या सिमरन या अच्छी-अच्छी कल्पनाएं आरम्भ कर देना।

मनुष्य जन्म से लेकर मृत्यु तक कुछ-न-कुछ सीखता रहता है। बचपन में उत्साह से सीखते हैं। जैसे-जैसे उम्र बढ़ती है सीखने का उत्साह कम होता जाता है। आज बुजुर्ग लोग मोबाइल चलाना नहीं जानते क्योंकि सीखने की इच्छा ही नहीं है, सीखने का उत्साह नहीं है। संसार एक पाठशाला है। हम हर पल सीखते हैं। हम मनुष्य से मधुर संगीत सीख सकते हैं। वृक्षों से दान और आश्रय देना सीख सकते हैं। पृथ्वी से सृजन क्षमता सीख सकते हैं। सिर्फ कुछ नवीन सीखने की प्रवृति अपनाए। भवन निर्माता मिस्त्री अपने कार्य पर जाते समय छैनी, फीता, मापक और अन्य सामान साथ लेकर चलता है।

आप भी अपने जीवन में सफलता के लिये अपने औजार साथ लेकर चलो। ये औजार हैं, लक्ष्य रखो आशा रखो। साकारात्मक सोच रखो। अपने तथा दूसरों के प्रति श्रेष्ठ भावना रखो। परिश्रम की शक्ति में विश्वास रखो। दृढ़ आत्मविश्वास रखें। आप की वह हर इच्छा पूरी होगी जिसके पीछे कल्याण है। व्यक्ति प्यार से, प्रोत्साहन से सीखता हैं इन दोनों दिव्य गुणों को जीवन में धारण करो जो कुछ सीखना चाहते हैं, प्राप्त करना चाहते हैं उनको अपनी कल्पना में अच्छी तरह बिठा लो और हर रोज उसे प्राप्त करने के लिये कोई-न-कोई साकारात्मक कार्य करें। यह सब करते हुए बिंदू रूप परमात्मा या इष्ट को याद करते रहें। आपको नई-नई प्रेरणाएं प्राप्त होंगी।

लोहे को लोहा काटता है। लोहे को लोहे से बनी हुई चुम्बक ही आकर्षित करती है। यह नियम बताता है कि जैसा आपका व्यक्तित्व होगा वैसे ही व्यक्तित्व के लोगों को आप अपनी ओर आकर्षित करते हैं। जैसा आप अन्य लोगों को प्रदान करते हैं वैसा ही प्रतिफल आप प्राप्त करते हैं।

आप सफल विचारों से अन्य व्यक्तियों को सम्पन्न करते हैं तो आपको भी सफल विचारों का उपहार मिलता है। आप लोगों पर पुष्प वर्षा करते हैं तो आप पर भी निश्चित रूप से पुष्प वर्षा ही होगी। आप अन्य लोगों पर धूल फेकेंगे तो आप पर भी धूल ही गिरेगी। ऊँचे गुम्बद वाली इमारत में ध्वनि करने पर उसी ध्वनि की प्रति ध्वनि आपको सुनाई देगी। बबूल का पेड़ बोने पर कांटों के अतिरिक्त और मिल भी क्या सकता है। इसलिए हमेशा अच्छी कल्पना रुपी विचारों के पेड़ लगाओ। ये सिद्धांत जीवन के प्रत्येक क्षेत्र में लागू होता है। आप लोगों के प्रति जैसी वृति अपनाते हैं, जैसी भावना रखते हैं उन्हें महान ईमानदार, शांत व प्रेमस्वरूप समझते हैं। तब आप अन्य लोगों को अपने प्रति वैसी ही वृति अपनाने के लिये बाध्य करते हैं।

(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)

स्त्री स्वास्थ्याचे कानमंत्र आरोग्य सखी

रुग्णानुभव १० – मार्च २०१० मध्ये एक रुग्ण श्रीगोंद्यावरून दीर्घ तपासणीचा रिपोर्ट घेऊन आले होते. शरीरामध्ये शुक्रजंतू तयारच होत नव्हते. अपत्यप्राप्तीची इच्छा मनात धरून ते आले होते. त्यांना बस्तीचिकित्सा केली. तसेच बस्तांड घृताचा उत्तरबस्ती सुरु केला. शिलजित कॅप्सुल, च्यवनप्राश, आयुर्वेदीय दिनचर्येचे पालन करण्यास सांगितले. पाच महिन्यानंतर त्यांच्यामध्ये शुक्रजंतूचे प्रमाण ७ मिलियन्स एवढे झाले. हे प्रमाण अत्यल्प होते. परंतु मी त्यांच्या पत्नीचाकरून स्त्रीबीज फुटल्यावर डागह. केले. चार महिने १.णख उपचारपद्धती केल्यानंतर अखेर तिला गर्भधारणा झाली.

रुग्णानुभव ११ – सोनालीचा आत्तापर्यंत तीन ते चार वेळा गर्भपात झाला होता. वारंवार गर्भपात होतो म्हणून उपचार घेण्यासाठी आली. तिच्या रक्ताच्या तपासण्या केल्यावर त्यातील टॉर्च टेस्टचा रिपोर्ट पॉझिटीव्ह आला. टॉर्च इन्फेक्शन कमी होईपर्यंत सहा महिने गर्भधारणा होऊ देऊ नका, असे त्यांना सांगितले. परंतु सांगूनही ती वेळेच्या आतच गर्भवती झाली. आता पुन्हा हिचा गर्भपात होऊ शकतो याची घरच्यांना कल्पना दिली व गर्भपात होऊ नये म्हणून सर्व उपचार सुरु केले. सर्व प्रकारे रुग्णाची काळजी घेतली. तरी सहाव्या महिन्यामध्ये वरमुठ अचानक फुटून अंगावरचे पाणी गेले. सोनोग्राफीवरून बाळाचे वजन ६०० ग्रॅम असल्याचे समजले. सर्व डॉक्टरांनी तिचे अॅबॉर्शन करण्याचा सल्ला नातेवाइकांना दिला. परंतु ते गर्भपात करून घेण्यास तयार नव्हते. शेवटी त्यांना पुणे येथे मोठ्या हॉस्पिटलमध्ये पाठविण्याचा सल्ला दिला. ते लगेच पुण्याला गेले. परंतु तेथील डॉक्टरांनीसुद्धा 'बाळ एकदम कोरडे आहे. अशा अवस्थेमध्ये बाळ जगू शकणार नाही, म्हणून तुम्ही गर्भपात करून घ्या' हाच सल्ला दिला. ते ऐकून ते परत आमच्याकडे उपचार घेण्यास आले. मॅडम, काहीही करा, परंतु आमचे हे बाळ वाचवा' असे ते सारखे म्हणत होते. मलाही बाळ वाचेल याबद्दल अजिबातच खात्री नव्हती. तशी त्यांना कल्पना देऊन तिला हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करून घेतले व उपचार सुरु केले. आहारामध्ये नारळाचे पाणी, गहरोप रस, आयुर्वेदिक मासानुमासिक औषधे, मोड आलेली कडधान्ये, पालेभाज्या सुरु केल्या.

मंत्रोपचारामध धील सर्व मंत्र दिवसातून एकदा म्हणण्यास सांगितले, ओम्कार गुंजन, ध्यान, दीर्घ श्वसन करावयास सांगून तिचे मन आनंदी व सकारात्मक विचारसणीत ठेवण्याचा प्रयत्न केला. दर पंधरा दिवसांनी आम्ही तिची सोनोग्राफी करुन घेत होतो. बाळाची वाढ चांगली होत होती. ॲलोपॅथिक, आयुर्वेदिक व आध्यात्मिक असे सर्व उपचार तिच्यावर करत होतो. सर्वांना आश्चर्य वाटेल असा फरक तिच्यामध्ये व बाळामध्ये होत होता. काही महिन्यांम ध्येच संपूर्ण वाढ झालेले बाळ जन्मास आले. यातून एकच निष्कर्ष झाले, की जर डॉक्टरांनी व रुग्णांनी धीर धरून सकारात्मक विचार ठेवले व उपचार केले तर नक्कीच यश मिळते.

(क्रमशः)

डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहमदनगर मोबाईल नं- ८७९३४००४००

आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये मोफत तपासणी व सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया शिबिरांचे आयोजन

नगर – जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटल एंड मेडिकल रिसर्च सेंटर येथे मोफत तपासणी व सवलतीच्या दरात उपचार शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. यात १३ ते २८ सप्टेंबर या कालावधीत कॅन्सर तपासणी, जनरल शस्त्रक्रिया, कान, नाक, घसा तपासणी, दंतरोग उपचार शिबीर होणार आहे. सकाळी १० ते दुपारी २ या कालावधीत होणाऱ्या या शिबिरांत तज्ज्ञ व अनुभवी डॉक्टरांची टिम रूग्ण तपासणी व उपचार मार्गदर्शन करणार आहे.

१३ सप्टेंबर रोजी कॅन्सर तपासणी शिबिर होईल. यात तोंडाचा, स्तनाचा, फुफ्फुस, आतडयाचा, लिव्हर, स्वादुपिंड, गर्भाशय इत्यादी कॅन्सर तपासणी व निदान केले जाईल. कॅन्सर सर्जन डॉ. अनिकेत शिंदे रूग्ण तपासणी व उपचार मार्गदर्शन करतील. याच दिवशी जनरल शस्त्रक्रिया शिबिर होणार असून तज्ज्ञ डॉ. आर. एन.पांडे, डॉ. भास्कर जाधव शिबिरात उपचार मार्गदर्शन करतील. लॅप्रोस्कोपी पोटाच्या जागेवर, बेंबीच्या ऑपरेशन जागेवरील हर्नीया शस्त्रक्रिया १० हजार रूपये, पित्ताशय काढणे १५ हजारात, स्त्रियांची गर्भाशयाची पिशवी काढणे (हिस्ट्रीक्टॉमी) १० हजारात, स्टॅपलर/लेझर पाईल्स शस्त्रक्रिया १५ हजार रुपये, ॲपेंडिक्स शस्त्रक्रिया ६ हजार ५०० रूपये, स्त्रियांचे बिजांड कोशावरील गाठी शस्त्रक्रिया ५ हजार रुपये, स्त्री वंध्यत्व तपासणीसाठी गर्भनलिकेची ट्युबल पेटेंन्सी २ हजार रुपये, लॅप्रोस्कोपी स्त्रीयांची कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया ३ हजार रुपयात केली जाणार आहे. शस्त्रक्रियेसाठी औषधे व आयसीयुचा खर्च वेगळा असेल.

२० सप्टेंबर रोजी कान, नाक व घसा तपासणी शिबिर होईल. घशाच्या एण्डोस्कोपीची सुविधा हॉस्पिटलमध्ये उपलब्ध असून शिबिरात लर्जी, चक्कर येणे, श्वास घेण्याची समस्या, बोलण्यात समस्या व इतर आजारांची तपासणी करण्यात येईल. ईएनटी सर्जन डॉ. सुकेशिनी गाडेकर व डॉ. अतुल तुपे रूग्ण तपासणी व उपचार मार्गदर्शन करतील.

२८ सप्टेंबर रोजी हॉस्पिटलमधील अद्ययावत दंत चिकित्सा विभागात दंतरोग उपचार शिबीर होणार आहे. यात मेटल कॅप बसवणे १ हजार, सिरॅमिक कॅप १५०० ते २५०० रुपये, रूट कॅनॉल २ ते ३ हजार रुपये, दातांची कवळी बसवणे ८ हजार ते १४ हजार रुपये, दात साफ करणे, दातात सिमेंट भरणे प्रत्येकी ५०० रूपयात केले जाईल. दंतरोग तज्ज्ञ डॉ. अर्पणा पवार, डॉ. प्राची गांधी, डॉ. स्वराज ठोले रूग्ण तपासणी व उपचार मार्गदर्शन करतील. शिबिरासाठी नाव नोंदणी आवश्यक असून औषध खर्च वेगळा असेल.

आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये अद्ययावत हायटेक पॅथोलॉजी लॅब तसेच ३५ अत्याधुनिक डायलिसिस मशीनची सेवा उपलब्ध आहे. डिजिटल एक्स रे २५० रूपये, सोनोग्राफी कलर प्रिंट व रिपोर्ट सह ८०० रूपये, सिटीस्कॅन १२५०, एम. आर.आय २५०० रूपयात केले जातात. याशिवाय २४ तास आनंदऋषीजी ब्लड बँकही उपलब्ध आहे. शिबिरांचा जास्तीत जास्त रूग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन जैन सोशल फेडरेशनच्या वतीने करण्यात आले आहे. अधिक माहिती व नाव नोंदणीसाठी संपर्क: ०२४१- २३२०४७३/७४/७५/७६

गणेशोत्सवानिमित्त गोरे डेंटल हॉस्पिटल, माळीवाडातर्फे बालघर अनाथ आश्रम येथे विद्यार्थ्यांना टी-शर्ट चे वाटप करताना दंततज्ज्ञ डॉ. सुदर्शन गोरे.

गोरे डेंटल हॉस्पिटलच्यावतीने विद्यार्थ्यांना टी-शर्ट चे वाटप

नगर – गणेशोत्सवानिमित्त डॉ. गोरे डेंटल हॉस्पिटल, माळीवाडा यांच्यातर्फे बालघर अनाथ आश्रम येथे विद्यार्थ्यांना टी-शर्ट चे वाटप करण्यात आले.

गणेशोत्सव निमित्त बालघर अनाथआश्रमातील विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित व्हावा यासाठी श्री विशाल गणपतींचा फोटो असलेले टी-शर्ट विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले, असे दंततज्ज्ञ डॉक्टर सुदर्शन गोरे म्हणाले.

या प्रसंगी इंजि. विनेश आडेप तसेच बालघर अनाथआश्रमचे संचालक युवराज गुंड आदी उपस्थित होते.

युवराज गुंड म्हणाले की, डॉ. सुदर्शन गोरे यांचा नेहमी अनाथाश्रमातील विद्यार्थ्यांना कोणत्या ना कोणत्या स्वरूपात मदतीचा हात असतो, अशा दानशूर व्यक्तींमुळे बालगृह अनाथाश्रमातील विद्यार्थ्यांना विविध स्वरुपाची मदत मिळत असते. भविष्यात देखील अशाच प्रकारचे उपक्रम बालघर अनाथ आश्रम येथे राबवण्याचा मानस डॉ. सुदर्शन गोरे यांनी व्यक्त केला.

गणेश उत्सवानिमित्त श्री स्वामी समर्थ प्रतिष्ठानच्या वतीने लिटील स्टार नर्सरी स्कुल येथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण प्रतिष्ठानचे अध्यक्ष संदिप दातरंगे यांच्या हस्ते करण्यात आले.

धमाल विनोदी बालनाट्य व बाल रंगकर्मींच्या सत्काराने 'किलबिल संस्थेचा' ३३ वा वर्धापनदिन उत्साहात साजरा

नगर – नाट्य व बालसांस्कृतिक क्षेत्रात गेली ३३ वर्षापासून कार्यरत असलेया किलबिल बालविकास संस्थेचा वर्धापन दिन धमाल विनोदी बालनाट्याच्या सादरीकरणाने व बाल रंगकर्मींच्या सत्काराने उत्साहात साजरा झाला. यानिमित्ताने सावेडीच्या माउली सभागृहात आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी बालरंग तज्ञ डॉ. विवेक देशपांडे होते. यावेळी प्रमुख पाहुणे डॉ. धनंजय कुलकर्णी आणि डॉ. अमित करडे, किलबिलचे माजी विद्यार्थी चित्रपट निर्माते स्वप्निल मुनोत, डॉ. प्रथमेश झेंडे व ॲड. पुष्कर तांबोळी आदींसह संस्थेचे अध्यक्ष डॉ.विजय जोशी, खजिनदार गौरी जोशी, बाल कलाकार, पालक व नागरिक उपस्थित होते. यावेळी बालनाट्य क्षेत्रात बहुमोल योगदान देवून अनेक कलाकार घडवल्याबद्दल जोशी दाम्पत्याचा सत्कार करण्यात आला.

यावेळी किलबिल संस्थेतून नाट्य प्रशिक्षण घेतलेल्या बाल कलाकारांनी 'गोष्ट धमाल नाटकाची' हे विनोदी नाटक सादर करून उपस्थितांची मने जिंकली. या किलबिल संस्थेच्या ३३ व्या वर्धापनदिनानिमित्त 'गोष्ट धमाल नाटकाची' या विनोदी बाल नाटकाचे सादरीकरण झाले. यावेळी बालकांच्या विनोदी अभिनयाने समाप्झाला हास्यल्हाळ उडाला.

नाटकातील बालकांच्या विनोदी अभिनयाने सभागृहात हास्यकल्लोळ उडाला. कार्यक्रमास उपस्थित मान्यवरांच्या हस्ते नाटकातील बालकांचा सन्मान करण्यात आला. तसेच अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद आयोजित बालनाट्य स्पर्धेत तृतीय क्रमांक प्राप्त 'मी एक बोन्साय' या नाटकातील बालकलाकारांचाही सत्कार करण्यात आला.

यावेळी पालकांना मार्गदर्शन करताना बालरंग तज्ञ डॉ. विवेक देशपांडे म्हणाले, सध्याच्या धकाधकीच्या दिनचर्या मुळे व कामाच्या तात्पतावामुळे पालक आपल्या बालकांना वेळ देऊ शकत नाहीत. त्यामुळे स्वप्निल मुनोत व ॲड. पुष्कर तांबोळी यांनी किलबिल संस्थेमुळेच घडलो असल्याचे नमूद करून अनुभव कथन केले. प्रास्ताविकात गौरी जोशी यांनी किलबिल संस्थेच्या प्रगतीचा आढावा घेवून उपक्रमांची माहिती दिली. डॉ.विजय जोशी यांनी पाहुण्यांचा परिचय दिला. कार्यक्रमास संस्थेचे सचिव रविराज रसाळ, उपाध्यक्ष अनिल जोशी, कार्याध्यक्ष गोपाल टिपरे, प्रसाद आंधळे, राजेंद्र लोळगे, राजश्री आंधळे व अक्षय गांधी आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन बाल कलाकार अस्मी चावक, राजसी भणगे, ध्रुव नेमणे, परिक्षित वानखेडे व गंधार जोशी यांनी केले.

येणारी पिढी सुसंस्कृत होण्यासाठी किलबील संस्थे सारख्या सुसंस्कार देणाऱ्या संस्था खूप उपयुक्त आहेत. नाटक ही ६४ कलांचा संगम असणारी कला आहे. या कलेमुळे सभाधीटपणा, आत्मविश्वास जागृती, देहबोली, एकाग्रता, संयम व सांघिक भावना आदी गुणांच्या माध्यमातून व्यक्तिमत्व विकास होतो.

यावेळी डॉ. धनंजय कुलकर्णी, डॉ. अमित करडे आदींनी पालकांना मार्गदर्शन केले. चित्रपट निर्माते स्वप्निल मुनोत व ॲड. पुष्कर तांबोळी यांनी किलबिल संस्थेमुळेच घडलो असल्याचे नमूद करून अनुभव कथन केले. प्रास्ताविकात गौरी जोशी यांनी किलबिल संस्थेच्या प्रगतीचा आढावा घेवून उपक्रमांची माहिती दिली. डॉ.विजय जोशी यांनी पाहुण्यांचा परिचय दिला. कार्यक्रमास संस्थेचे सचिव रविराज रसाळ, उपाध्यक्ष अनिल जोशी, कार्याध्यक्ष गोपाल टिपरे, प्रसाद आंधळे, राजेंद्र लोळगे, राजश्री आंधळे व अक्षय गांधी आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन बाल कलाकार अस्मी चावक, राजसी भणगे, ध्रुव नेमणे, परिक्षित वानखेडे व गंधार जोशी यांनी केले.

गरजूंची सेवा म्हणजेच ईश्वर सेवा

संदिप दातरंगे यांचे प्रतिपादन; श्री स्वामी समर्थ प्रतिष्ठानच्या वतीने शालेय विद्यार्थीना साहित्य वाटप

नगर – गणेश उत्सव धार्मिक उत्सव असून त्यानिमित्ताने अनेक ठिकाणी हा उत्सव वेगवेगळ्या पद्धतीने साजरा केला जातो. अनेक संघटनाच्या वतीने विविध उपक्रमांनी साजरा होतो. या उत्सवाच्या माध्यमातून गरजूंना मदत केल्यास खऱ्या अर्थाने गणेशाची सेवा होते. गरजूंची सेवा म्हणजेच ईश्वर सेवा या उक्तीप्रमाणे श्री स्वामी समर्थ प्रतिष्ठानच्या वतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करून सामाजिक संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे प्रतिष्ठानचे अध्यक्ष संदिप दातरंगे यांनी सांगितले.

गणेश उत्सवानिमित्त श्री स्वामी समर्थ प्रतिष्ठानच्या वतीने लिटील स्टार नर्सरी स्कुल येथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण संदिप दातरंगे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी गणेश दातरंगे, शुभम दातरंगे, सुनिल सुडके, योगेश पंधाडे, स्वप्निल जाधव, राजु वामन, संचालिका सौ.ममता यंगल व स्मिता मंगलापर आदी उपस्थित होते. यावेळी लिटील स्टार नर्सरी स्कुलच्या विद्यार्थ्यांना दप्तर, कंपास, वह्या, पेन, पेंड हे शालेय साहित्य तसेच खाऊचे वाटप करण्यात आले. यावेळी स्कूलच्यावतीने श्री स्वामी समर्थ प्रतिष्ठानच्या उपक्रमाचे कौतुक करून आभार मानले.

आठरे पाटील स्कूलमध्ये फूटबॉल स्पर्धेतील विजेत्यांना सन्मानचिन्ह प्रदान

सावेडी विभागातील आठरे पाटील पब्लिक स्कूलमध्ये शालेय फूटबॉल स्पर्धेतील विजेत्यांना सन्मानचिन्ह प्रदान करताना संस्थेचे अध्यक्ष डॉ. अनिल आठरे पाटील आदी.

नगर – सावेडी विभागातील आठरे पाटील पब्लिक स्कूल या इंग्रजी माध्यमाच्या वसतिगृहात्मक शाळेचा १४ वर्षाखालील मुलांचा फूटबॉल संघ आणि १७ वर्षाखालील मुला-मुलींच्या फूटबॉल संघाने शालेय फूटबॉल स्पर्धेत बाजी मारली. त्याचा आज संस्थेच्या वतीने शाळेत सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला शहरातील वाडिया पार्कच्या मैदानावर क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय अंतर्गत घेण्यात आलेल्या शालेय फुटबॉल स्पर्धेत शहरातील एकूण १९ शाळेच्या फूटबॉल संघाने सहभाग घेतला होता.

सकाळी प्रार्थनेच्या वेळी सदर विजयी फूटबॉल संघातील सर्व खेळाडू व क्रीडा प्रशिक्षक संदीप दरंदले यांचा संस्थेचे अध्यक्ष डॉ. अनिल आठरे पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे राजेश भाटिया, विश्वस्त मानसिंग आठरे पाटील यांच्या हस्ते पदक व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक, पर्यवेक्षिका, समन्वयक सर्व शिक्षकवृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

शाळेचे खेळाडू टेमकर कृष्णा, चंद अशोक, चंद भानुदास व सय्यद आफिया, पवार निलम यांनी आपल्या शाळेच्या फूटबॉल संघांना विजयी करण्यात महत्त्वाची भूमिका निभावून शालेय फूटबॉल स्पर्धेत नानाचा तुरा रोवला. आठरे पाटील पब्लिक स्कूलच्या १७ वर्षाखालील मुलांच्या फूटबॉल संघाने उत्कृष्ट अशी कामगिरी करत उपांत्य सामन्यात ओ. ए.एस.आय.एस.इंग्लिश मीडियम शाळेच्या फूटबॉल संघाचा २-१ ने पराभव करत अंतिम सामन्यात प्रवेश करून अतितटीच्या अंतिम सामन्यात श्री साई इंग्लिश मीडियम शाळेच्या फूटबॉल संघाचा २-० ने पराभव करून विजेता संघ ठरला. तसेच १७ वर्षाखालील मुलींच्या फूटबॉल संघाने सुद्धा उत्कृष्ट अशी कामगिरी करत उपांत्य सामन्यात रेसिडेन्सील हायस्कूलच्या फूटबॉल संघाचा १-० ने पराभव करून अंतिम सामन्यात प्रवेश केला. आणि आयकॉन पब्लिक स्कूलच्या बलाढ्य फूटबॉल संघाचा ३-० ने पराभव करत मुलींच्या फूटबॉल संघाने शालेय फूटबॉल स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. तसेच १४ वर्षाखालील मुलांच्या फूटबॉल संघानेही आपल्या कौशल्याने स्पर्धेत उत्तम कामगिरी बजावली. उपांत्य सामन्यात श्री साई इंग्लिश मिडीयम स्कूल फूटबॉल संघाचा ४-० ने पराभव करत अंतिम सामन्यात प्रवेश केला.आणि अंतिम सामन्यात आयकॉन पब्लिक स्कूलच्या फूटबॉल संघाशी चुरशीची लढत देऊन ३-० ने सामना जिंकला. तिन्हीही विजयी फूटबॉल संघांचाही विभागीय पातळीवर निवड झाली.

शाळेच्या विजयी फूटबॉल संघाच्या खेळाडूना शाळेचे क्रीडा प्रशिक्षकसंदीप दरंदले, सोनवणे शीतल यांचे मार्गदर्शन लाभले.

आनंदधाम समोरील राष्ट्रीय शिक्षण मंडळाच्या एन. एन. सस्था ऑषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयात एडवांटमेंट इंडिया कंपनीत निवड झालेले विद्यार्थी. समवेत प्राचार्य डॉ. विशाल पांडे आदी.

एन. एन. सस्था कॉलेज ऑफ फार्मसी आयोजित कॅम्पस मुलाखतीमध्ये ४१ विद्यार्थ्यांची एडवांटमेंट कंपनीत निवड

नगर – नगर शहरातील आनंदधाम समोरील राष्ट्रीय शिक्षण मंडळाच्या एन. एन. सस्था ऑषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयात अहमदनगर येथे एडवांटमेंट इंडिया (LLP) कंपनीच्या सहकार्याने मेडिकल कोडर या पदासाठी ५ सप्टेंबर रोजी प्लेसमेंट ड्राईव्ह आयोजित करण्यात आला.

मुलाखतीसाठी अहमदनगर शहर अहमदनगर जिल्हा व इतर जिल्हातील एकूण २७५ विद्यार्थ्यांनी या मुलाखतीसाठी नोंदणी केली. शेवटच्या फेरीमधून एकूण ४१ विद्यार्थ्यांची अंतिम नियुक्ती करण्यात आली. प्रशिक्षण आणि नियुक्ती कक्ष अधिकारी डॉ. जयप्रकाश सूर्यवंशी आणि प्राध्यापक राजश्री सुर्वे यांनी कॅम्पस ड्राइव्ह यशस्वी पार पाडण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. एडवांटमेंट इंडिया कंपनीचे असिस्टंट मॅनेजर (H.R) मि. हिरेन शहा यांनी कॅम्पस आयोजित करण्यासाठी संधी दिली यासाठी विद्यालयाने त्यांचे आभार मानले.

तसेच या मुलाखतीसाठी कंपनीमधून असिस्टंट मॅनेजर (ऑपरेशन) मि. समीर अली, सीनियर टीम लीडर (ऑपरेशन) मिस विकास रंगपरिया व मिस आरती चव्हाण लीड एक्झिक्यूटिव्ह (H.R), मिस प्रियांशी गुरुवानी व एक्झिक्यूटिव्ह (H.R) मि. हेमंत क्रिस्टियन यांनी सहकार्य केले.

विद्यार्थ्यांना विद्यालयाचे प्राचार्य डॉ. विशाल पांडे व सर्व प्राध्यापक यांचे मार्गदर्शन लाभले. या उपलब्धीसाठी विद्यार्थ्यांचे, प्राचार्यांचे व सर्व प्राध्यापक यांचे संस्थेचे सचिव डॉ. शिवाजीराव काकडे, माजी जिल्हा परिषद सदस्या हर्षदाताई काकडे, विश्वस्त पृथ्वीसिंह काकडे व तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी लक्ष्मण बिटाळ यांनी अभिनंदन केले

जि.प. वैदूवाडी येथील प्राथमिक शाळेत शिक्षक दिनानिमित्त मखदुम सोसायटीतर्फे विद्यार्थ्यांना मोफत टी-शर्टचे वाटप करताना सुनील भंडारी आदी.

कोणतेही मदत कार्य हे कर्तव्य समजून करण्याची गरज

सुनील भंडारी यांचे प्रतिपादन; शिक्षकदिन निमित्त मखदुम सोसायटीतर्फे विद्यार्थ्यांना मोफत स्पोर्टस् टी शर्ट वाटप

नगर – समाजामध्ये गरजूंना मदत करणार्यांची संख्या वाढली आहे. पण लोक मदत करणे म्हणजे उपकार समजून करायला लागले आहे. ही मानसिकता बदलून कोणतेही मदत कार्य हे कर्तव्य समजून करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन संगीतप्रेमी सुनील भंडारी यांनी केले.

मखदुम एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर सोसायटीच्यावतीने शिक्षक दिनानिमित्त पाईपलाईन रोड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वैदूवाडी मधील सर्व विद्यार्थ्यांना दानशूरांच्या सहकार्याने मोफत स्पोर्टस् टी शर्ट चे वाटप सुनिल भंडारी यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी मखदुम एज्युकेशन ॲंड वेल्फेअर सोसायटीचे अध्यक्ष आबीद दुलेखान, जिल्हा परिषद प्राथ शाळा वैदवाडी मुख्याध्यापक नंदकुमार खंडागळे,

उपाध्यापिका सौ. मिनाक्षी जाधव आदि उपस्थित होते.

पुढे बोलतांना सुनील भंडारी म्हणाले की, समाजामध्ये स्वार्थीपणा फार वाढत चाललेला आहे. कोणतेही समाजा कार्य करतांना बहुतांश संघटनांचा त्यामागे काही ना काही हेतू असतो, असे समाजकार्य किंवा पुण्यकार्य परमेश्वरालाही नकोय. नि:स्वार्थीपणाने आज कार्य करण्याची खरी गरज असून, त्यासाठी बौद्धीक प्रबोधन होण्याचीही आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नंदकुमार खंडागळे यांनी केले. प्रास्ताविक मिनाक्षी जाधव यांनी केले तर आभार सय्यद शफक यांनी मानले.

विचार भारती व श्रीनि फाउंडेशनच्या जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कारांचे १५ सप्टेंबर रोजी वितरण

विचार भारती श्रीनि फाउंडेशन
श्रीगोंदा - निरा आर्थोटिया परिवार
आदर्श शिक्षक पुरस्कार - २०२४

नगर – शैक्षणिक क्षेत्रात समर्पित भावनेने काम करुन राष्ट्र उभारणी मध्ये योगदान देणा-या जिल्हातील शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरवण्याचा उपक्रमास विचार भारती व श्रीनि फाउंडेशनच्या वतीने या वर्षीपासून सुरुवात केली आहे. यासाठी पूर्ण जिल्ह्यातून प्राथमिक व माध्यमिक तसेच कला व क्रीडा विभागातील शिक्षकांकडून प्रस्ताव मागवण्यात आले होते. या प्रस्तावांमधून नियम व निकषानुसार निवड समितीतील तज्ञ सदस्यांमार्फत मुल्यांकन करुन चार शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार व आठ शिक्षकांना तालुकास्तरीय प्रोत्साहनपर पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे.

या पुरस्कारांचे वितरण १५ सप्टेंबर रोजी सायंकाळी ४ वाजता सावेडीच्या माऊली सभागृहात होणार आहे. शिक्षणतज्ञ व गीता परिवाराचे अध्यक्ष डॉ.संजय मालपाणी यांच्या हस्ते होणाऱ्या या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी मराठा विद्या प्रसारक समाजाचे सचिव ॲड.विश्वासराव आठरे असणार आहेत. यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे व्यवस्थापन समितीचे सदस्य स्वींद्र शिणणपूरकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती विचार भारतीचे सहसचिव महेंद्र जाखेडे यांनी दिली.

याबाबत अधिक माहिती देताना श्रीगोणल जाखोडिया म्हणाले, विचार भारती व श्रीनि फाउंडेशनच्या वतीने सुरु करण्यात आलेल्या या उपक्रमाच्या पहिल्याच वर्षी जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागातून शिक्षकांनी प्रतिसाद दिला. यासाठी ६५ हून अधिक प्रस्ताव प्राप्त झाले.

यामध्ये प्राथमिक विभागातून जामखेड तालुक्यातील नायगाव येथील जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक लक्ष्मिकांत ईडलवार, माध्यमिक विभागातून संगमनेर येथील ध्रुव ग्लोबल स्कूलचे गिरीश डागा यांना मातोश्री रामेबरी रामदिन जाखोटिया स्मृती पुरस्कार घोषित करण्यात आला आहे. तसेच शेवगावच्या आबासाहेब काकडे विद्यालयातील कलाशिक्षक शितल गोरे व नेवासा येथील दादासाहेब धाडणे पाटील विद्यालयाचे क्रीडा शिक्षक अभिजित दळवी यांना रामदिन जाखोटिया स्मृती पुरस्कार घोषित करण्यात आला आहे. दोन्ही विभागातील पुरस्कारांचे स्वरूप प्रत्येकी रुपये १५ हजार रोख, सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्रक असे आहे.

याशिवाय परिक्षण समितीने शिफारस केल्यानुसार तालुकास्तरीय प्रोत्साहनपर पुरस्कारही देण्यात येणार आहेत. यामध्ये अशोक डोळसे सीतारास सारडा विद्यालय नगर, सुनिता इंगळे पालिका शाळा कोपरगाव, आदिनाथ जोशी भी.रा.खटोड विद्यालय श्रीरामपूर, सुनील कटारिया तिलोकचंद जैन विद्यालय पाथर्डी, नरेंद्र राठोड जि.प. शाळा ती-यावीवाडी अकोले, सुजय बाबर साईबाब कन्या विद्यालय शिर्डी, नंदलाल काळदाते न्यू इंग्लिश स्कूल कर्जत व ज्ञानेश्वर कवडे न्यू इंग्लिश स्कूल पारनेर आदींना प्रशस्तीपत्रकाने सन्मानित करण्यात येणार आहे.

या पुरस्कारासाठी डॉ.शरद कोलते, अनुराधा ठाकूर, प्रा.मकरंद खेर, डॉ. रेखारणी खुराणा, प्रा.आसावरी झपके, अरविंद पारगावकर, प्राचार्य अशोक सामडे व प्रा.संजय पोपावकर या तज्ञांच्या संमतीने आलेल्या प्रस्तावांचे नियम व निकषानुसार मुल्यांकन करुन पुरस्कारांची घोषणा केली.

१५ सप्टेंबर रोजी होणाऱ्या पुरस्कार वितरण समारंभात शिक्षणतज्ञ व गीता परिवाराचे अध्यक्ष डॉ.संजय मालपाणी हे मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यक्रमास जास्तीत जास्त नागरिकांनी व पालकांनी उपस्थित रहावे असे आवाहन विचार भारतीचे अध्यक्ष अरुण कुलकर्णी, सचिव सुधीर लांडगे, विशारद पेटकर व श्रीनि फाउंडेशनचे शामसुंदर जाखोटिया, बालकिस्न जाखोटिया, गोविंदा जाखोटिया यांनी केले आहे.

समाजकार्यासह अध्यात्मिक विविध क्षेत्रात योगदान देणाऱ्या ऋषीतुल्यांचा आदर करणे हे कर्तव्यच : वेदमूर्ती दत्तोपंत पाठक

नगर – ऋषी पंचमी हा दिवस शुद्धीकरण आणि प्रायश्चित पाळण्याचा असतो. या दिवशी ऋषींना स्मरण करून त्यांच्याप्रती समाजात चांगले काम करून शैक्षणिक, धार्मिक, अध्यात्मिक तसेच विविध क्षेत्रात योगदान देऊन समाजसेवेचे व्रत जोपासणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करणे हे एकप्रत आहे. ते व्रत जोपासत ऋषीतुल्य व्यक्तींचा आदर करणे हे आपले सर्वांचे कर्तव्य आहे, असे प्रतिपादन सनातन धर्मसभा नगर शाखेचे अध्यक्ष वेदमूर्ती दत्तोपंत पाठक यांनी केले.

सनातन धर्म सभेच्यावतीने ऋषीपंचमी निमित्त गायत्री मंदिरात नगर शहरातील नामवंत, ज्येष्ठ अशा ऋषीतुल्य व्यक्तींचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष घनपाटी वेदमूर्ती महेश रेखे यांच्या हस्ते, धर्मसभेचे पदाधिकारी डॉ.नंदकिशोर मुळे, मोरेश्वर मुळे, राजेंद्र नागरकर, रमेश देशपांडे, दयानंद रेखी, निलेश धर्माधिकारी, गिरीश मुळे, समीर उपाध्ये, श्रीपाद तांबोळी, विश्वनाथ पोद्दार अनंत देशपांडे, सुरेखा देशपांडे, गणेश वैकर व सत्कारमूर्ती उपस्थित होते.

नगर येथील सनातन धर्मसभा ऋषिपंचमी निमित्त ऋषितुल्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी वेदमूर्ती दत्तोपंत पाठक, संस्थेचे उपाध्यक्ष घनपाटी महेश रेखे, नरेंद्र खिस्ती, रमाकांत मुळे, सुहास मुळे, डॉ. अनिकेत घोटणकर, सौ. पुष्पा मालेराव, निळकंठ मुळे, श्रीनिवास झंवर, संचालक आदी (छाया – विजय मते)

नगर सनातन धर्मसभा यांच्यावतीने सन्मान सोहळा

वेदमूर्ती पाठक गुरुजी पुढे म्हणाले, नगर सनातन धर्मसभेला१२७ वर्ष पूर्ण होत आहे हा वटवृक्ष चांगलाच मोठा झाला आहे. सर्वांनी चांगले काम करत या शाखेला दृढता, बळकटी आली आहे. सर्वसामान्य लोकांनी या सनातन धर्मसभेस तन–मन–धनाने सहकार्य केल्याने वैभवशाली अशी धर्मसभा झाली याचा आनंद आहे. यावेळी महेश रेखे व दत्तोपंत पाठक यांचे हस्ते ऋषीतुल्यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, पुस्तके देऊन सत्कार करण्यात आला. या सत्कार मूर्तीमध्ये नरेंद्र खिस्ती, रमाकांत मुळे, सुहास मुळे, श्रीनिवास झंवर, डॉ. अनिकेत घोटणकर, सौ. पुष्पा मालेराव, निळकंठ मुळे यांचा समावेश होता.

यावेळी महेश रेखे यांनी सांगितले की, मी धर्मसभेचा सदस्य झालो. माझी कार्यक्षमता व धर्मसभेचे काम पाहून आता उपाध्यक्ष पदाची जबाबदारी पार पाडत असताना अनेक चांगले उपक्रम राबविले.

यावेळी सत्कारमूर्ती उद्योजक, डॉक्टर, यांनी आपली मनोगते व्यक्त केली. सनातन धर्मसभा नगर शाखेच्या कार्याचे कौतुक केले. धर्मसभा उपाध्यक्ष घनपाटी महेश रेखे यांचा निवडीमुळे नगरचे नाव उंचावले असे श्री.देशपांडे यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रभाताई मुळे, सूत्रसंचालन दिनकर कुलकर्णी यांनी केले तर निळकंठ देशमुख यांनी आभार मानले.

एडीनबर्ग येथील रॉयल कॉलेज ऑफ सर्जन्सची 'एमआरसीएस डिग्री' स्वनित देशपांडे यांना प्राप्त

नगर – मूळचे नगरचे डॉ. स्वनित हेमंत देशपांडे यांना इंग्लंडमधील एडीनबर्ग येथील रॉयल कॉलेज ऑफ सर्जन्सची एम.आर. सी. एस. डिग्री प्राप्त झाली आहे. रॉयल कॉलेज ऑफ सर्जन्स, एडीनबर्ग जगातील सर्वात जुने कॉलेज असून या डिप्लिमुळे डॉ. स्वनित यांना जागतिक स्तरावर आपले कौशल्य सिद्ध करण्याची संधी मिळाली आहे. सदर डिग्री मिळवणारे ते नगरमधील एकमेव डॉक्टर ठरले आहेत. एमआरसीएस परीक्षा दोन विभागामध्ये असते

पार्ट वन आणि पार्ट दू. दोन्ही परीक्षा डॉ. स्वनित यांनी अत्यंत उत्तम रीतीने पार करून एडीनबर्ग येथील 'एमआरसीएस' डिग्री प्राप्त केली आहे.

ते येथील भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलचे विद्यार्थी असून, बारावीत२०१० झालेल्या नीट परीक्षेमध्ये एमबीबीएस प्रवेश परीक्षेत राज्यात १० व्या क्रमांकाची रँक मिळवून डॉ. स्वनित देशपांडे यांना मुंबईतील केईएममध्ये एमबीबीएस पदवीसाठी ॲडमिशन मिळाली. सदर एमबीबीएस परीक्षा त्यांनी केईएम येथून उत्तम रीतीने प्राप्त केली होती. सन २०१२–१३ या वर्षात त्यांना दोराबजी टाटा शिष्यवृत्तीही प्राप्त झाली. सन २०१५ मध्ये त्यांच्या शोध निबंधाची लिडेन (नेदरलँड्स) येथील आंतरराष्ट्रीय परिषदेत निवड झाली.

सन २०१६ साली झालेल्या पीजी नित परीक्षेत उत्तम यश प्रदान करून नायर हॉस्पिटल येथे एम.एस. साठी प्रवेश घेतला. २०२० मध्ये त्यांनी मुंबईतील नायर रुग्णालयात एम.एस. जनरल शस्त्रक्रिया डिग्री विशेष प्राविण्याने रुग्णालयात प्रथम क्रमांकाने मिळवली. २०२२ मध्ये त्यांनी मुंबईतील सुपर स्पेशालिटी सायन रुग्णालयात एमसीएच युरोलॉजीसाठी प्रवेश घेतला. २०२४ मध्ये त्यांना सर्वोत्कृष्ट निवासी डॉक्टर पुरस्कार प्राप्त झाला. युरोलॉजी सोसायटी ऑफ इंडिया नॅशनल स्टोन क्रिझमध्ये त्यांनी प्रथम क्रमांक पटकावला.

किडनीतील खडे, मूत्रनडद्याची विना टाका शस्त्रक्रिया, प्रोस्टेट ग्रंथीचे आजार, किडनी, प्रोस्टेट कॅन्सर, पुरुष वंध्यत्व शस्त्रक्रिया मध्ये त्यांचा विशेष हातखंडा व प्राविण्य आहे. डॉ. स्वनित हे नगरमधील देशपांडे हॉस्पिटलचे संचालक लेप्रोस्कोपीक सर्जन डॉ. हेमंत देशपांडे व स्त्री रोग तज्ज्ञ डॉ. प्रिती देशपांडे यांचे पुत्र आहेत. वैद्यकीय क्षेत्रात नगरचे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर उज्वल केल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.





गाडीलकर विद्यालयात सखी सावित्री समितीची स्थापना

सावेडीतील केशवराव गाडीलकर हायस्कूलमध्ये शासन आदेशान्वये सखी सावित्री समिती स्थापन करण्यात आली. समितीच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव नामदेवराव गाडीलकर यांची निवड करण्यात आली तर सचिवपदी मुख्याध्यापक अनिल गायकवाड असून इतर पदाधिकारी शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार नियुक्त केले आहेत. समितीच्या स्थापनेनंतर डॉ. योगिता सत्रे यांसे मुलींसाठी गुड टच बॅड टच याविषयी व्याख्यान होऊन मुलींना पोस्को कायद्याची सविस्तर माहिती देण्यात आली व त्यांच्या सर्व शंकांचे निरसन करण्यात आले.

एक विश्वास.. एक बांधिलकी..
रामकृष्ण अर्बन
श्री रामकृष्ण अर्बन सहकारी क्रेडीट सोसायटी लि.
हेड ऑफिस:– रामकृष्ण भवन, जुनी वसंत टॉकीज, माळीवाडा, अहमदनगर– ४१४००१
फोन नं. (०२४१) – २३४५०३४, २३४७३१०

सोनेतारण दागिन्यांचा लिलाव जाहीर नोटीस

श्रीरामकृष्ण अर्बन सहकारी क्रेडीट सोसायटी लिमिटेड, माळीवाडा, अहमदनगर या संस्थेच्या मुख्य शाखा व सावेडी शाखेत सोनेतारण ठेवून कर्ज घेतलेल्या खाली नमूद केलेल्या कर्जदारांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की त्यांनी संस्थेकडे सोनेतारण ठेवून घेतलेल्या कर्जाची मुदत १ वर्ष होती. विहीत मुदत संपून देखील सदर कर्जाची रक्कम व त्यावरील व्याजाच्या रकमेसाठी वेळोवेळी नोटीसा व स्मरणपत्रे पाठवावी लागली. त्याचा पोस्टेजचा व इतर खर्च संस्थेकडे विहीत मुदतीत जमा करून सोने चीज वस्तू सोडवून घेणे आवश्यक होते. संस्थेशी सोनेतारण कर्ज घेतलेली केलेल्या करारनाम्यातील अटीनुसार व सोनेतारण कर्ज नियमावली क्र. ८,९ व १० मधील तरतुदीनुसार विहीत मुदतीत कर्ज फेड करून खाते बंद न केल्यामुळे तुम्ही ठेवलेल्या चीज वस्तुंची लिलावाद्वारे विक्री करून थकबाकी वसूल करण्याचा संस्थेस अधिकार आहे. यासुद्धे आता या जाहीर नोटीसीद्वारे तुम्हाला कळविण्यात येते आहे की, तुम्ही दिनांक १८/९/२०२४ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत तुमच्याकडील थकबाकी पूर्ण भरून तुमचे सोने चीजवस्तु सोडवून नेल्या नाहीत अथवा खाते नवेकुने करून दिले नाही तर दिनांक १८/९/२०२४ रोजी दुपारी ३ वाजता संस्थेच्या माळीवाडा येथील मुख्य कार्यालयात तुमच्या सोने चीजवस्तूंचा लिलाव करण्यात येईल. सदरच्या लिलाव विक्री आलेल्या रकमेतून कर्ज / व्याज व खर्च रक्कम वसूल केली जाईल व लिलावात आलेल्या रकमेतून कर्ज / व्याज व खर्च रक्कम वसूल न झाल्यास त्या रकमेची वसुलीही कर्जदारांकडून करून घेणेत येईल व त्यानंतर कर्जदारांची कोणतीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही त्याची नोंद घ्यावी. तसेच सोनेतारण लिलाव करणे अथवा स्थगित करणे याबाबतचे सर्व अधिकार मा. संचालक मंडळास राहतील.

मुख्य शाखा – (लिलाव यादी) दि. १०/९/२०२४

अ.नं.	खाते नं.	नाव	पत्ता
१)	४५९८४७	नूरबानी साबीर कुरेशी	१९५३, व्यापारी मोहल्ला तालुका पोलिस स्टेशन जवळ, अहमदनगर
२)	४५९८६०	महाजबीन वसीम कुरेशी	१९५३, व्यापारी मोहल्ला तालुका पोलिस स्टेशन जवळ, अहमदनगर
३)	४५९६७	अरुण रखमाजी कदम	वारुळाचा मारुती मंदिराजवळ, नालेगाव, अहमदनगर
४)	५०६६८	सतिष रतन हंबर्डे	मु. दहिगाव, पो. शिराढोण, तालुका, जिल्हा अहमदनगर
५)	५११७८	राखी संजय घव्हाण	घ.नं. २१८, रोहिणी लॉंड्री जवळ, मुसळे गल्ली, केडगाव, अहमदनगर
६)	५१२०६	सचिन सुखदेव वारे	घ.नं. ७, कांदा गोडाऊन, तपोवन रोड, गुंडू साही गोडाऊन जवळ, सावेडी, अहमदनगर
७)	५१२२४	अक्षय भानुदास गवारे	नगर सोलापूर रोड, वाकोडी फाटा, वाकोडी, अहमदनगर
८)	५१३४७	भानुदास यादव गवारे	नगर सोलापूर रोड, वाकोडी फाटा, वाकोडी, अहमदनगर
९)	५१२६०	राम परशुराम खर्ले	मु.पो. कौडगाव, ता.जिल्हा अहमदनगर
१०)	५१४९२	सतिष साहेबराव सरोदे	४४८, वैष्णवी माता मंदिराजवळ, नाईक मळा, जेऊर, अहमदनगर
११)	५१४३५	संभाजी सदाशिव म्हस्के	मु. दहीगाव, पो. शिराढोण, मुंजोबा मंदिराजवळ, अहमदनगर
१२)	५१४३८	हनुमंत बाबुराव पिसाळ	थेरगाव, ता. कर्जत, जिल्हा अहमदनगर
१३)	५१४४०	बाबासाहेब मारुती गावडे	टाकळी काझी, अहमदनगर
१४)	५१७९८	जालिंदर सावळी निमसे	मु.पो. पोखसुरी, ता.नि. अहमदनगर
१५)	५०९८३	राधाकिसन चिमाजी नवले	मु. गुंजाळ, पो. काऱड, ता. राहुरी, जि. अहमदनगर
१६)	५१३२८	राधाकिसन चिमाजी नवले	मु. गुंजाळ, पो. काऱड, ता. राहुरी, जि. अहमदनगर

सावेडी शाखा – लिलाव यादी

अ.नं.	खाते नं.	नाव	पत्ता
१)	६२३४	पालपल राजाराम कृष्णमूर्ती	घर नं. १७, सर्व्हे नं. १३७/२, सौरभ रो.ही. सोसायटी, बोल्हेगाव, अहमदनगर
२)	६२९१	यात्रक विशाल बहिरू	घर नं. १६, शिमला कॉलनी, प्रशांत नगर, पाईपलाईन रोड, सावेडी, अहमदनगर
३)	६४५१	जंगले भारत मनोहर	जंगले वस्ती, डोंगरगण, अहमदनगर
४)	६६००	वाकळे अभिषेक छबू	संघर्ष चौक, तलाठी ऑफिस जवळ, सावेडी गाव, सावेडी, अहमदनगर
५)	६६३६	गायकवाड सोमनाथ आनंदराव	विझल रखुमाई मंदिरासमोर, माधव रो.ही.सो., शाहुनगर, केडगाव, अहमदनगर
६)	६६७८	दिघे अभय सुरेश	प्लॉट नं. २५, मंगल ही. सोसायटी, गर्भनट बँकेमागे, गुलमोहोर रोड, सावेडी, अहमदनगर
७)	६६७९	दिघे अभय सुरेश	प्लॉट नं. २५, मंगल ही. सोसायटी, गुलमोहोर रोड, सावेडी, अहमदनगर
८)	६६९५	आव्हाड विष्णू बाबाजी	पांगरमल, नजले पिंपोली, अहमदनगर
९)	६७४९	डाके अमोल अशोक	दरेवाडी, सोलापूर रोड, अहमदनगर
१०)	६८२०	सर्से शैलेंद्र विष्णू	९१३, सरेवाडी, जेऊर, अहमदनगर
११)	६९३७	भगत शिवाजी तुकाराम	शेंडी, अहमदनगर
१२)	६७६६	कुढ्ढाळ गितांजली बंडू	दरेवाडी, सोलापूर रोड, अहमदनगर

स्थळ – अहमदनगर, दि. १०/९/२०२४

शशिकांत पुंडलिक व्यवस्थापक | ओमप्रकाश चांडक सोनेतारण कर्ज उपसमिती प्रमुख | मधुसुदन सारडा व्हा. चेअरमन | गोपाल मणियार चेअरमन

रामकृष्ण अर्बन गोल्ड लोन फक्त ७%* व्याजदरात

समाज घडविण्यामध्ये शिक्षकांचे मोठे योगदान

आ. संग्राम जगताप यांचे प्रतिपादन; कल्याण रोड अनुसयानगर येथे शिक्षक दिनानिमित्त गुरुजनांचा सन्मान सोहळा

नगर–कल्याण रोडवरील अनुसयानगर येथे के. दिलीप शिंदे यांच्या सन्मानार्थ शिक्षकदिनी गुरुजनांचा सत्कार करताना आ. संग्राम जगताप.

नगर – आपला देश हा युवकांचा देश म्हणून ओळखला जात असून विद्यार्थी देशभरुदे गुरुजनांनी बाल वयातच पाल्यांना घडविण्याचे काम केले असल्यामुळे २१ व्या शतकामध्ये भारत देश हा महासत्ता म्हणून ओळखला जाईल. माजी राष्ट्रपती के. अब्दुल कलाम यांचे स्वप्न साकार झाल्याशिवाय राहणार नाही शिक्षकांनी शालेय शिक्षणाबरोबरच आपली परंपरा व महान संस्कृतीचे धडे द्यावे त्या माध्यमातून सुसंस्कृत पिढी निर्माण होईल. कल्याण रोड परिसरामध्ये मोठ्या संख्येने शिक्षक वृंद राहत असल्यामुळे या भागाला शिक्षकांची एक ओळख निर्माण झाली आहे. शिक्षक हा समाजातील एक महत्त्वाचा घटक असून समाज घडविण्यामध्ये त्यांचे मोठे योगदान असल्याचे प्रतिपादन आ. संग्राम जगताप यांनी केले.

कल्याण रोड अनुसयानगर येथे के. दिलीप शिंदे यांच्या स्मरणार्थ शिक्षक दिनानिमित्त गुरुजनांचा सत्कार कार्यक्रम झाला. यावेळी आ. संग्राम जगताप, युवराज शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, कवी संजय कळमकर, माजी प्राचार्य खासेराव शितोळे, प्रा. माणिकराव विधाते, रेश्मा आठरे, लालचंद हराळ, संभाजी चौधरी, संजय गोसावी, ईश्वर नागवडे, राजेंद्र गोरे, लक्ष्मण खोडदे, रोहित काळोखे, भैय्या मुंडलिक, रवी मैड, महेश सातपुते, सचिन देरे आदि सह शिक्षक वृंद उपस्थित होते.

युवराज शिंदे म्हणाले, शिक्षक वृंद समाजातील एक महत्त्वाचा घटक असून आई–वडिलांनंतर शिक्षक हेच विद्यार्थ्यांना घडविण्याचे काम करत असतात. शिक्षक दिनानिमित्त गुरुजनांचा सन्मान करणे गरजेचे असून आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते सत्कार झाला. शिक्षकांच्या माध्यमातून एक चांगली पिढी निर्माण होत असते असे ते म्हणाले.

शिक्षण व्यवस्थेमध्ये नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर केला जात असून शिक्षकांनी या युगामध्ये विद्यार्थ्यांशी आपले नाते घट्ट करावे शाळेमध्ये शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुस्तक वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी काम करावे, सध्या विद्यार्थ्यांना कमी वयात मोबाईलची एक चटक लागली आहे आणि ती घातक आहे. विद्यार्थ्यांना एक तरी मराठी वृत्तपत्र वाचण्यासाठी प्रवृत्त करावे जेणेकरून समाजामधील चांगल्या वाईट घडामोडी समजल्या जातील असे मत माजी प्राचार्य खासेराव शितोळे यांनी व्यक्त केले. सूत्रसंचालन संजय गोसावी यांनी केले तर आभार संभाजी चौधरी यांनी मानले.

श्री संत नागेबाबा मल्टीस्टेट को–ऑप. अर्बन क्रेडीट सोसायटी लि., अ.नगर

कर्जास तारण सोने दागिन्यांचा जाहीर लिलाव नोटीस

आमचे संस्थेने खाली नमूद कर्जदारांना सोने तारणावर दिलेल्या कर्जाची संबंधितांनी परतफेड केलेली नाही. त्यामुळे त्यांचे कर्ज थकबाकी झालेले आहे. सबब, संबंधित थकबाकीदारांना जाहीर नोटीसीन्वये कळविण्यात येते की, संबंधित थकबाकीदार, कर्जदार यांना त्यांचेकडील थकीत सोने तारण कर्जाचा सद्यःचा तद्नुषंगिक खर्चासह भरणा करणेबाबत वेळोवेळी कळवूनही त्यांनी त्यांचेकडील थकीत कर्जबाकीचा भरणा न दिल्याने त्यांचेकडील कर्ज वसुलीसाठी कर्जास तारण सोन्याचे दागिन्यांचा जाहीर लिलाव दिनांक २०/०९/२०२४ या रोजी संस्थेच्या **नागेबाबा हाऊस, माऊली संकुल सभागृहासमोर, नगर–मनमाड रोड, सावेडी, अहमदनगर** येथे दुपारी १.०० वाजता करण्यात येईल. तत्पूर्वी संबंधित थकबाकीदार कर्जदारांनी त्यांच्याकडील संपूर्ण कर्जाचा भरणा दिनांक १९/०९/२०२४ पावेतो संस्थेकडे केल्यास त्याचे तारण सोन्याचे दागिन्यांचा लिलाव स्थगित केला जाईल.

अन्यथा निर्धारित वेळी व ठिकाणी तारण सोन्याचे दागिन्यांची जाहीर लिलावाने विक्री करण्यात येईल. त्याबाबत संबंधितांस संस्थेविरुद्ध कोणतीही तक्रार करता येणार नाही, तसेच कर्जास तारण सोन्याचे विक्री रक्कमेतून थकीत कर्जाचे व्याज, मुद्दल तसेच तद्नुषंगिक खर्चासह संपूर्ण वसूल न झाल्यास उर्वरित थकीत रक्कमेचे वसुलीसाठी संस्था संबंधित कर्जदारांविरुद्ध योग्य ती पुढील कायदेशीर कारवाई करील लिलावाचे वेळी संबंधित कर्जदारास हजर राहता येईल, तसेच लिलावाचे अटी–शर्ती लिलावापूर्वी १० मिनिटे वाचून दाखविण्यात येतील. काही तांत्रिक कारणास्तव लिलाव रद्द करण्याचे अधिकार संस्थेस आहेत. तरी वरील बाबींची सर्व संबंधितांनी कृपया नोंद घ्यावी. थकित सोनेतारण कर्जदारांची नावे खालीलप्रमाणे देत आहेत.

शाखा : सावेडी

विकास पाजगोहोड मंजेर, पु–वी–देवरा लक्ष्मी निवाणी वाड़ाव तालुका –श्रीगणपूर जिल्हा– अ. नगर

आदिनाथ भास्कर गोडसे, मु.पो. निंबळक मुंजोबा चौक जिल्हा. अ नगर

शाखा : केडगाव

अमोल किसन गांगुरडे, खोकर वडाळा महादेव, अहमदनगर ४१३७३९

स्वाक्षरीत,
जनरल मॅनेजर,
श्री संत नागेबाबा मल्टीस्टेट
को–ऑप. अर्बन क्रेडीट सोसायटी लि., अ.नगर.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहमदनगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

खा. निलेश लंके शिक्षक मदत कक्षाच्या जिल्हाध्यक्षपदी प्रसाद शिंदे यांची नियुक्ती

नगर – खा. निलेश लंके यांच्या संकल्पनेतून अहमदनगर जिल्ह्यातील, संस्थाचालक, शिक्षकांच्या विविध प्रश्नांवर मार्ग काढण्यासाठी अहमदनगर जिल्ह्यात शिक्षक मदत कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. या कक्षाच्या जिल्हाध्यक्षपदी स्वामिमानी शिक्षक संघटनेच्या जिल्हा अध्यक्षपदी प्रसाद शिंदे यांची निवड करण्यात आली आहे. खा. लंके यांनी नियुक्ती पत्र नुकतेच श्री. शिंदे यांना दिले.

प्रसाद शिंदे यांनी सांगितले की, खा.निलेश लंके यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षकांचे प्रश्न सोडवण्यासाठी अहोरात्र मेहनत घेणार आहे. नगर जिल्ह्यामा गुणवंत शिक्षकांची मोठी परंपरा आहे. शिक्षकांचे आरोग्य विषयक, शैक्षणिक विषयक अडचणी तसेच अन्य प्रश्नांसंदर्भात एक समान व्यासपीठ उपलब्ध आहे. मदत कक्षाच्या माध्यमातून निरपेक्ष भावनेने सोडविण्यासाठी प्रयत्न केले जाणार असून या साठी संपर्क क्रमांक ९४०५६३६६५६ देण्यात आला आहे. खा. निलेश लंके यांनी नेहमीच शिक्षकांच्या हिताचा विचार केला आहे, असे शिंदे यांनी सांगितले.

श्री.शिंदे यांनी शिक्षक संघटनेच्या माध्यमातून शिक्षकांचे विविध प्रश्न सोडवण्यासाठी आझाद मैदान मुंबई ते जिल्हा पातळीपर्यंत आंदोलने करून शिक्षकांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले. याच गोष्टीचा परिपाक म्हणून खा. निलेश लंके यांनी श्री.शिंदे यांना ही जबाबदारी दिली आहे. या मदत कक्षाच्या माध्यमातून सर्व शिक्षक बंधू भगिनींना आवाहन करण्यात येत आहे की आपण आपल्या समस्या सोडविण्यासाठी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

नगरमध्ये पर्युषण महापर्व निमित्त तनिष व दर्श गांधी यांचे ८ उपवास

नगर – खिस्त गल्ली, गणपती मंदिर जवळ राहणारे परम राजेंद्र गांधी यांचे चिरंजीव तनिष गांधी (वय १२) व प्रशांत गांधी यांचे चिरंजीव दर्श (वय ९) या दोघा भावांनी जैन धर्मातील पर्युषण पर्व निमित्त आठ दिवसाचे निरंकार उपवास केले.

त्यांना साध्वीजी ऋजुप्रज्ञाश्रीजी महाराज आदिठाणा पाच, प्रवर्तक श्री सुंदरऋषीजी महाराज व सुतमुनीजी महाराज यांचे विशेष प्रेरणा व आशीर्वाद मिळाले.

चि. तनिष हा अशोकभाऊंक फिरोदिया हायस्कूलमध्ये सातवीत शिकत आहे व चि. दर्श हा सेझेड हार्ट कॉन्व्हेंट शाळेत चौथी मध्ये शिकत आहे. जैन मंदिर कापड बाजार, धार्मिक परीक्षा बोर्ड तसेच लिटिल फ्लावर स्कूलच्या संचालिका सौ. मनीषाताई बोगावत यांच्याकडून त्यांचा विशेष बहुमान करण्यात आला. आई सौ. अनिता व सौ. प्रिया यांच्याकडून विशेष तपोबल मिळाले

इतक्या लहान वयात आठ दिवसाचे कठोर उपवास केल्यानिमित्त सर्व स्तरातून विशेष कौतुक होत आहे. चिरंजीव दर्श व तनिष हे विजय शेषमल गांधी चादरवाला यांचे नातू आहे.

जाहीर नोटीस

उमाम लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की खालील परिशिष्ट वर्णन केलेल्या प्लॉट निळकत ही विद्यमान मालक सुभाष लक्ष्मण नवले, सुभाषी सुभाष नवले व संदिप बहिरनाथ बारस्कर यांनी स. अहमदनगर यांचे मालकी महिमादीची अपूर्ण व्यवहे प्रथम कब्जात आहे. विद्यमान मालक यांनी सदर निळकतचे आणी अतिशयात कायम्यूक्त बोजी सामने चाण व कबुल केलेले आहे. सदर व्यवहारपोटी विद्यमान मालक यांनी विश्वासपोटी आमचे अशिलाकडून रक्कम घेतलेली असुन सदर निळकत लवकरच आमचे अशिलाच बोजी देण्याचे अशुन लवकरच खरेदीखत होणार आहे. सदर निळकतीवर कोणत्याही बँकेचे कर्ज नाही. सदर निळकती बाबत कोणतही आक्षेपत, कजेदार, दावा, साडा दावा, महसिल पत्र, नगराई हुकुमन, दावा, कोर्ट वसनकर्ज, जप्त, पटान, सीज ड. अन्य कोणत्याही स्वरुपाची उपरपरा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालयानतुन २१दा (१) दिवसाचे आत योग्य त्या कागदोपतीं व पुराव्यासह खालील पचायत अथवा आमुन दाखुन आपली बाजी करन घावी. अन्यथा सुदीचे कोणती कोणतही हुरुक्त न आल्यास सदर निळकतचा निर्णय व निजोजबी आहेत असे समजुन खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर कोणतीही कोणतीही सदार याबाबत गही त्याची नोंद घ्यावी.

निळकतीची वर्णन :– वि.१. अहमदनगर शा वि १. । तालुका नगरपेठी अहमदनगर महानगरपालिका अहमदनगर हद्दीतील तसेच मा. दुय्यम निबंधक साहेब, अ. नगर यांचे कार्यक्षेत्रातील नोंदने शाखेडी नेमीत सर्व्हे नं. २४४ मशील सालील वर्णनाप्रमा प्लॉट :–

प्लॉट नं.	क्षेत्रफळ चौ.मी.	चतुःसिमा			
		पुर्वेस	दक्षिणेस	पश्चिमेस	उत्तरेस
४८	१८४.३७	९ मी. रस्ता	प्लॉट नं. ४५	सर्व्हे नं. २५४ पैकी	प्लॉट नं. ४७

वेशोप्रमाणे चतुःसिमायुक्त संपूर्ण प्लॉट निळकत व तदंगभुत वस्तु, महिमाट, वागणुकीचे इकारच्या कादीही एन राखुन न वेगिता असो.

अॅड. सुनिल गोरक्षनाथ हरीभंडे
अॅड. ओंकार पंडीत गोरे
अहमदनगर
दिनांक :– १०/०९/२०२४
मो. नं. ९८६०४४६४६३
ऑफिस– गाळा नं. ४, महालक्ष्मी चेंबर्स, पाईपलाईन रोड, सावेडी, अहमदनगर.

व्यवसाय करण्यासाठी फूड इंडस्ट्रीमध्ये उतरायचे ठरवले की सुरुवातीला मेन्यू, टेस्ट, रॉ मटेरिअल, जागा अशा अनेक गोष्टींचा विचार केला जातो. परंतु, आपल्याला पूर्ण तयारीनिशी उतरायचे असल्यास त्याच्याही एक पाऊल पुढे विचार करू शकतो. तो म्हणजे 'लॉजिंग'. हॉटेलिंगमध्ये सुद्धा 'क्यू. एस. आर' (क्विक सर्व्हिस रेस्टॉरंट) आणि लॉजिंग हा पर्याय घेऊन अविनाश नवले या तरूणाने धाडस करून यशस्वीसुद्धा करून दाखविले.

सर्वसमावेशक 'गोविंदा'

अविनाश यांचे 'गोविंदा' हॉटेल अँड लॉजिंग सुद्धा पुणे- नाशिक राष्ट्रीय महामार्गावर उभे आहे. लॉजिंग सोबतच 'क्यू. एस. आर' (क्विक सर्व्हिस रेस्टॉरंट), म्हणजेच लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी ग्राहकांना कमीतकमी वेळात सर्व प्रकारची 'रिफ्रेशमेंट' मिळेल या हेतूने व्यवसाय सुरू केला.

अचिव्हर

सुरुवातीपासूनच स्वत:चा व्यवसाय सुरू करण्याची त्यांची इच्छा होती. त्यासाठी त्यांनी 'हॉटेल मॅनेजमेंट'ची डिग्री पूर्ण केली. त्यानंतर लंडनमधून 'एम.बी.ए. इन हॉस्पिटॅलिटी'मध्ये पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. २०१३ पर्यंत तेथे नोकरीसुद्धा केली. त्यानंतर बरेच संशोधन केल्यानंतर इंडस्ट्रीअल केटरिंगपासून सुरुवात केली. लोकांकडून चांगला फिडबॅक आल्यानंतर २०१८ पासून फक्त रेस्टॉरंट सुरू केले. स्थानिक लोकांना शहराचा 'फिल' यावा आणि प्रवासी लोकांना रिफ्रेशमेंट मिळावी, असे दोन्ही उद्देश डोळ्यांसमोर ठेवून व्यवसायाची सुरुवात झाली. हळूहळू प्रवासी लोकांकडूनच राष्ट्रण्याच्या सोयीबाबत विचारणा होऊ लागल्यानंतर लॉजिंग सुरू केले.

राष्ट्रीय महामार्गावरून येणारा ग्राहक फक्त एक रात्र राहण्यासाठीच येत असतो. त्यामुळे कमीतकमी वेळात कम्फरटेबल होऊन लवकर झोप लागण्यासाठी काही गोष्टी लक्षात घेणे गरजेचे आहे. त्यासाठी बेड, मॅट्रेसेस आरामदायी असाव्यात. तसेच रूम्स आणि वॉशरूम्स स्वच्छ ह्व्यात. तसेच त्यामध्ये ॲझिल, शॅम्पू, साबण इत्यादींची सोय करावी लागते.

यासोबतच काही लोक फक्त नाश्ता आणि रिफ्रेश होण्यासाठी येत असतात. त्यांच्यासाठी वॉशरूम्स स्वच्छ आणि बाहेरच्या बाजूला असावेत. तसेच ग्राहकांना पाय मोकळे करण्यासाठी, मुलांना खेळण्यासाठी जागा असावी. सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे गाडीतून उतरल्यापासून परत बसेपर्यंत ग्राहकाचे पोट आणि मन तृप्त व्हायला हवे, असे अविनाश यांचे म्हणणे आहे.

'क्यू. एस. आर.'मध्ये येणाऱ्या ग्राहकांना थांबायला वेळ नसतो. त्यामुळे ऑर्डर केल्यानंतर कमीतकमी वेळात ते द्यायला हवे. त्यासाठी किचनमध्ये कांदा, काजू, अशा काही ग्रेव्ही शिजवून तयार ठेवायला ह्व्यात. तसेच कांदा, मिरची अशा गोष्टीही चिरून ठेवायला ह्व्यात. फक्त या सर्व गोष्टी दररोज करून त्याच दिवशी संपणे सुद्धा गरजेचे आहे, असे ते सांगतात. अविनाश यांच्याकडे भाज्या या दररोज ताज्या येत असतात. तसेच बाकी किराणा आठवड्यातून एकदा आणला जातो. तसेच किचन, क्लिनिंग आणि फ्रेंट स्टाफ या प्रकारे स्टाफचे वर्गीकरण आणि योग्य मॅनेजमेंट करायला हवे. अशा प्रकारचे रेस्टॉरंट आणि लॉजिंग शहराच्या बाहेर असल्याने योग्य स्टाफ पाहणे गरजेचे आहे.

अविनाश यांचे 'गोविंदा' हॉटेल हे अनेक देस्थान्तच्या मार्गावर असल्याने अनेक प्रायव्हेट बसेस देखील त्यांच्या येथे थांबतात. त्यांच्याकडे एकूण आठ रूम्स आणि एक पेन्टहाऊस अशी सोय आहे. त्यामुळे फूड टेस्ट आणि रूम्स सर्व्हिस या दोन्हीचे संतुलन राखणे गरजेचे आहे.

जोश

शेर की जुबानी

ना जाने इतनी मोहब्बत
कहां से आई है उसके लिए।
की मेरा दिल भी उसकी खातिर
मुझसे रूठ जाता है।

है युब्बुल शिकायते हमें आपकी सारी,
लेकिन कहना तो थोडा
मुस्कुराकर कहना

बहुत खुबसूरत होते हैं ऐसे रिश्ते
जिन पर कोई हक भी ना हो
और शक भी ना हो।

स्मार्ट ट्रिक्स

लपवा तुमची परचेस हिस्ट्री

गूगलकडे युजर्सची माहिती असते, हे आपण जाणतोच. युजर्सच्या आवडीनिवडी गूगल ट्रॅक करत असतं. तुम्ही काय खरेदी करताय, कोणत्या वस्तू सर्च करताय हेही गूगल बघत असतं. पण तुमची ही सर्च हिस्ट्री गूगलपासून लपवून ठेवता येते. यासाठी माय अकाउंट डॉट गुगल डॉट कॉम/परचेसमध्ये जाऊन गूगल अकाउंटमध्ये लॉग इन करा. इथे गूगल तसंच इतर लोकेशन्सवरचे ऑनलाईन व्यवहार दिसतील. इथे तुमच्या जी मेल अकाउंटवर पाठवण्यात आलेली ऑनलाईन व्यवहारांची पावतीही असेल. यानंतर 'रिमूव्ह परचेस' आणि 'व्यू ई मेल' या ऑप्शनची निवड करा. आता रिसिटवाल्या मेल्स डिलिट करत जा. थ्रॅशमध्ये जाऊन या मेल्स कायमच्या डिलिट करून टाका.



स्मार्ट ट्रिक्स

असा रेकॉर्ड करा स्क्रीन

यू ट्यूबसाठी 'लेट्स प्ले' व्हिडिओ बनवताना स्क्रीन रेकॉर्ड करावा लागतो. पण लॅपटॉप किंवा कॉम्प्युटरमध्ये अशी सोय नसते. विंडोज १० पीसी किंवा लॅपटॉपवर स्क्रीन रेकॉर्ड करायचा असेल तर सिस्टिमसमध्ये जाऊन 'एक्सबॉक्स' ॲप ओपन करा. त्यात साईन इन करा. यानंतर 'विंडोज प्लस जी' या कीज दाबा. यानंतर 'येस धीस इज अ गेम' वर क्लिक केल्यावर स्क्रीन रेकॉर्ड करण्याचा पर्याय मिळेल. यानंतर 'स्टार्ट रेकॉर्डिंग'वर क्लिक करा. मग स्क्रीन रेकॉर्डिंग सुरू होईल. हे रेकॉर्डिंग व्हिडिओज किंवा कॅप्चर फोल्डरमध्ये सेव्ह होईल.



मस्ट हॅव

या ॲक्सेसरीज हव्यातच!

कार घेऊन बाहेर पडताना आपण काही वस्तू सोबत ठेवणे अत्यंत गरजेचे असते. अडीअडचणीच्या वेळी या गोष्टी नक्की उपयोगाला येऊ शकतात. ✻ फोन होल्डर : आजकल स्मार्टफोनचा वापर केवळ बोलण्यासाठी नव्हे तर नेव्हीगेशन, गाणी ऐकण्यासाठी आणि कॉलिंगसाठी देखील केला जातो. त्यामुळे चांगला फोन होल्डर गरजेचा आहे. ✻ पोर्टेबल टायर इन्फ्लेटर : एखाद्या अज्ञातस्थळी कारचे टायर पंक्चर झाले तर हे उपकरण तुमचा प्राण वाचवू शकते. पोर्टेबल टायर इन्फ्लेटर टायरची हवा भरण्यास मदत करेल. या टायरमध्ये पंक्चर झाले तरी तुम्ही हवा भरुन तुमची कार १०० ते १५० किमी पर्यंत वापर करु शकता. ✻ फर्स्ट-एड किट : कारमध्ये प्रथमोपचार पेटी असायलाच हवी. आपातकालीन स्थितीत आपल्याला हे मेडिकल किट कामी येऊ शकते. ✻ छोटी हातोडी : कार पुरात अडकली तर दरवाजे काही वेळा एअर लॉक होतात. त्यामुळे कारच्या काचा फोडण्यासाठी हातोडीचा उपयोग होऊ शकतो.



बी अलर्ट

'१९३०' हा नंबर मोबाईलमध्ये सेव्ह करा!

सध्याच्या काळात अनेक कामे ही घरबसल्या करण्याची सोय उपलब्ध होत आहे. बँक, बुकिंग संबंधीची कामे आता घरबसल्या होत आहेत. परंतु या तंत्रज्ञानाचे काही तोटे पण सहन करावे लागत आहेत. या मालाजालात बडे अधिकारी, बडे नेते, पुढारी, प्रशासकीय अधिकारी, पोलीस सुद्धा अडकल्याचे दिसून येते. या भामट्यांपासून लोकांना सावध करण्यासाठी आणि त्यांच्या झटपट पाठलागासाठी केंद्रीय गृहमंत्रालयाने एक हेल्पलाईन क्रमांक दिला आहे. सायबर गुन्हे प्रकरणात नागरिक १९३० हा क्रमांक डायल करु शकतात. हा क्रमांक तातडीने तुमच्या मोबाईलमध्ये सेव्ह करुन ठेवा. ज्यावेळी तुम्हाला गरज पडेल, त्यावेळी हा क्रमांक डायल करा. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच हे काम केले तर तुम्हाला लवकर मदत मिळू शकते.

पाळा सोशल मीडिया एटिकेट्स

वेगळ्या वाटा

सध्याचा जमाना ऑनलाईनचा. सगळ्या सोयीसुविधा एका क्लिकवर उपलब्ध आहेत. म्हणूनच आता नोकरी शोधण्याच्या पारंपरिक पद्धतीही बदलल्या आहेत. विविध कंपन्या गूगल किंवा इतर साईट्सवरून उमेदवारांची निवड करतात. 'लिंक्डइन', 'ट्विटर', 'इन्स्टाग्राम', 'यू ट्यूब' आणि 'फेसबुक'सारखी व्यासपीठं उमेदवारांना नोकरी शोधायला मदत करतातच शिवाय योग्य व्यक्तींशी संपर्कही करून देतात. सोशल मीडियावरचं तुमचं अस्तित्व तुम्हाला चांगली नोकरी मिळवून देऊ शकतं. यासोबतच तुमची नोकरी हिरावूनही घेऊ शकतं. सोशल मीडियाच्या वापराचे काही एटिकेट्स आहेत. हे एटिकेट्स फॉलो करून तुम्ही सोशली ॲक्टिव्ह राहू शकता.

